मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २४० ■ बुधवार, १३ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# लोकनेते रामशेठ ठाकूर अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या इमारतीचे उद्‌घाटन

**बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उलवे नोडमध्ये**





**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : सर्व समाजाचे प्रेरणास्थान, गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सत्कार सोहळा तसेच दर्जेदार शिक्षण देणाऱ्या आणि नावलौकिक असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या इमारतीचा उदघाटन सोहळा महाराष्ट्राचे राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दिनांक १३ मे रोजी सायंकाळी ०६.३० वाजता उलवे नोड मधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर मैदानावर भव्य स्वरूपात होणार आहे.

या सोहळयास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे वने मंत्री गणेश नाईक, महिला व बाल कल्याण मंत्री आदितीताई तटकरे, रोजगार हमी फलोत्पादन व खार जमीन विकास मंत्री भरतशेठ गोगावले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व रायगड लोकसभा खासदार सुनिल तटकरे, मावळ लोकसभा खासदार श्रीरंग बारणे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार रवीशेठ पाटील, आमदार डॉ. विश्वजित कदम, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार निरंजन डावखरे, आमदार विक्रांत पाटील, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार धैर्यशिल पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यातून हजारो युवकांना रोजगार, शिक्षण व सामाजिक आधार देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक शैक्षणिक आणि सामाजिक संस्था उभ्या राहिल्या असून समाजातील सर्व घटकांसाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे समाजकारणाला प्राधान्य देणारे आणि दानशूर वृत्तीचे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. गरीब कुटुंबातून पुढे येत त्यांनी संघर्षाच्या जोरावर आपले स्थान निर्माण केले. त्यांच्या कार्याचा मुख्य गाभा समाजसेवा आहे. शिक्षण, सामाजिक, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक, आपत्ती मदत या क्षेत्रांमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक शिक्षण संस्थांना मदत करून ग्रामीण आणि कष्टकरी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे त्यांनी खुली केली.सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून ते सतत गरजू लोकांना मदत करतात. समाजातील वंचित, पीडित आणि गरजू लोकांना आधार देणे हे त्यांचे जीवनव्रत आहे.राजकारणात असूनही त्यांनी नेहमी समाजकारणाला अग्रक्रम दिला. साधेपणा, जनसंपर्क आणि लोकाभिमुख कार्यामुळे ते महाराष्ट्रातील एक आदर्श लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांचा अमृतमहोत्सवी वर्ष महत्वाचा आणि प्रेरणादायी आहे. त्याच अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावर आधारीत आढावा घेणाऱ्या 'रामपर्व' या विशेष पुस्तकाची निर्मिती करण्यात आली असून त्याचे प्रकाशनही यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

उलवे परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने उभारण्यात आलेली रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल ही प्रशस्त इमारत, सुसज्ज वर्गखोल्या अत्याधुनिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धतीमुळे परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली असून या विद्यालयाच्या इमारतीचा उद्घाटन सोहळा यावेळी संपन्न होणार आहे.

तरी या विशेष सोहळयास पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक हितचिंतकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे अध्यक्ष आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते व समितीचे कार्याध्यक्ष जे.एम. म्हात्रे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येत असलेल्या मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर)कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी पनवेल महानगरपालिका कार्यालयात बैठक पार पडली. या बैठकीला एसआयआर अभियानाचे प्रदेश संयोजक माजी खासदार किरीट सोमय्या, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, महापालिकेचे



वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी महापालिका क्षेत्रातील विविध मतदारसंघांमधील मतदारयाद्यांचे अद्ययावतीकरण आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्याबाबत सविस्तर रणनीती आखण्यात आली. या बैठकीत महापालिका हद्दीत गेल्या काही काळात वितरित करण्यात आलेल्या जन्म-मृत्यू दाखल्यांच्या संदर्भातही चर्चा करण्यात आली. या बैठकीला सभागृहनेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेवक परेश ठाकूर, रवींद्र भगत, सुमित झुंझारराव, अजय बहिरा, शशिकांत शेळके, प्रीती जॉर्ज, अस्मिता घरत, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटये, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारयाद्या दोषमुक्त करणे आणि अवैध नोंदी रोखणे यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला.

## पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची घेतली नवनियुक्त पदाधिकार्यांनी भेट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची रायगड जिल्हा व पनवेल विधानसभा मधील नवनियुक्त पदाधिकार्यांनी भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.

यावेळी नवनिर्वाचित पनवेल जिल्हाप्रमुख दीपक निकम, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील आणि महानगर प्रमुख एडवोकेट समाधान काशीद यांनी मातोश्री निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन नियुक्ती बद्दल आभार मानले. सदरवेळी उद्धव ठाकरे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना



मोलाचे मार्गदर्शन करून पुढील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पक्षाचे उपनेते बाळ माने, उपनेते बबनदादा पाटील, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण, पनवेल महानगरपालिका गटनेता आणि महिला संघटिका सौ लीना अर्जुन गरड व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा विरोधात माळवदे यांची उच्च न्यायालयात याचिका

**दैनिक युवक आधार**

**(नेवासा प्रतिनिधी )** - राज्यभरातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची कामे पूर्ण करण्यास झालेला विलंब,निकृष्ट दर्जाची कामे, प्रशासन व ठेकेदारांचा भ्रष्टाचार या संदर्भात राज्य सरकार विरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांच्या वतीने मुंबई उच्चन्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली.सदर याचिका औरंगाबाद खंडपिठातील न्यायाधीश मा.अजित कडेथणकर व मा. विभा कंकनवाडी यांच्या बेंचणे दाखल करून घेतली आहे.

**पाणी पुरवठ्याच्या लाखो कोटींच्या योजना सरकारच्या नाकर्तेपणामुळे, निधीअभावी आज बंद पडून आहे. प्रशासणाची व ठेकेदारांची भूमिका ही संशयास्पद आहे.पाण्याचा प्रश्न हा जनतेच्या जीविताचा प्रश्न असून यासाठी लढा देणार व जनतेला न्याय मिळवून देणार**

**- मा.संभाजी माळवदे**

राज्यभरात पाणी पुरवठ्याची लाखो कोटींची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाअंतर्गत सुरु आहे. यात दहा ते पंधरा गावे मिळून एक योजना अशी कामे सुरु असून यामध्ये हजारो लिटरच्या पाणी साठवण टाक्या, पाणी फिल्टर प्लांट, पाण्याच्या सोअर्स पासून साठवण टाक्यापर्यंत पाईपलाईन टाकणे, गावात अंतर्गत पाईप लाईन टाकणे, अशा कामांचा समावेश आहे. राज्यभरात लाखो करोड रुपयांच्या बजेटची कामे असणाऱ्या या योजना पूर्णत्वास जाण्यास तयार नाही.जवळ जवळ सर्वच योजनाचा पूर्णत्वाचा कालावधी हा उलटून गेलेला आहे सर्वच योजनाना मुदतवाढ दिलेला कालावधी देखील संपलेला आहे. बऱ्याच ठिकाणी पाणी टाक्याचे काम अपूर्ण आहे, फिल्टर प्लांटचे काम अपूर्ण आहे तर गावातील अंतर्गत पाईप लाईन टाकण्याच्या कामास अजून सुरुवात झालीच नाही. तर काही ठिकाणी टाक्यांची निकृष्ट कामे केल्याने योजना सुरु होण्याआधी टाक्या पडण्याची भीती निर्माण झाली आहे. कामाच्या पूर्णत्वाचा कालावधी संपल्यावर ठेकेदारास दंड आकारणी करणे गरजेचे असताना ठेकेदारकडून दंड आकारणी न करता ठेकेदारांना प्रशासनानी पाठीशी घालत प्रशासन व ठेकेदार यांनी मिळून मोठा भ्रष्टाचार यामध्ये केला आहे. याविरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी मजीप्राचे कार्यकारी अभियंता तसेच प्रशासनाकडे पाठपुरावा केला. आंदोलने केली परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामात सुधारणा झाली नाही. अहिल्यानगर विभागात सत्तावण योजनापैकी बोटावर मोजण्या इतक्या योजनाचीच कामे सुरु आहेत. राज्यभरात हीच परिस्थिती आहे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या या ढिसाळ कारभाराविरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी राज्य सरकार विरोधात औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली.याचिकाकर्ते संभाजी माळवदे यांच्या वतीने खंडपिठातील वरिष्ठ वकील ॲड.युनूस पठाण हे काम बघत आहे.लवकरच याबाबत पुढील सुनावणी होणार आहे. मजीप्राच्या विरोधातील ही याचिका ही संपूर्ण राज्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.



**पाटोदा - मंगेवाडी, ता.पाटोदा येथील श्री.महारुद्र सिताराम ढेरे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल पाटोदा येथे सत्कार करुन शुभेच्छा देताना. ॲड.सुशील कोठेकर, बाबासाहेब मुळे, संतोष लवांडे, भागवत निकम, भागवत नेमाने, अजय सुरवसे शेठ, पोलीस कॉन्स्टेबल रमेश ढेरे साहेब, अण्णासाहेब खंडागळे सर, गोसावी सर, सुदर्शन येडे, बाबू ढेरे, सरगर सर सह इत्यादी उपस्थित होते.**

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

## तहसीलदारांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनी उर्वीन चाचेरेचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी** : लाखनी तहसील कार्यालयातील शिपाई नंदकिशोर चाचेरे यांची कन्या उर्वीन नंदकिशोर चाचेरे हिने दहावीच्या परीक्षेत ९४.६० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या उज्ज्वल यशाबद्दल महसूल कर्मचारी संघटना, तालुका लाखनीच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला.तहसील कार्यालयात आयोजित छोटेखानी कार्यक्रमात तहसीलदार शीतल घावटे यांच्या हस्ते उर्वीनचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी तहसीलदार घावटे यांनी उर्वीनचे अभिनंदन करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी मिळविलेले यश हे संपूर्ण महसूल विभागासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाला महसूल कर्मचारी संघटनेचे तालुकाध्यक्ष मनीष अवसरे यांच्यासह ओमेश बारापात्रे, उमेश गणवीर, जयेशकुमार मेटांगे, सुनील राठोड, सुचिता कावळे, सुलोचना डोंगरे, मंजुषा कांबळे, नागेश्वर टिचकुले, देवदास मेश्राम, अविनाश राठोड, राहुल अस्वले व राकेश बिलवणे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सोयगाव शहरातील काळे नगरात श्री .महादेव पिंडची स्थापना

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव शहरातील काळे नगर येथे भगवान महादेव यांच्या पवित्र पिंडीची स्थापना मोठ्या भक्तिभावाने आणि धार्मिक उत्साहात करण्यात आली. या मंगलमय प्रसंगी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला असून “हर हर महादेव”च्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले. गावाच्या सुख-समृद्धीसाठी, शांतता, उत्तम आरोग्य आणि उज्ज्वल भविष्यासाठी महाकाल यांच्या चरणी मनोभावे प्रार्थना करण्यात आली.धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक ऐक्याचे सुंदर दर्शन या कार्यक्रमातून घडून आले.या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन गोकुळ कोळी यांनी केले होते.तसेच नगरसेवक गजानन कुडके यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.सर्वांनी एकत्र येत महाआरती,अभिषेक आणि विविध पूजा विधींमध्ये भक्तिभावाने सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान परिसरात दिव्य आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली होती. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या सोहळ्यात सहभागी होत धार्मिक परंपरेचे जतन करण्याचा संदेश दिला. ग्रामस्थांच्या एकोप्यामुळे आणि सामूहिक सहभागामुळे हा धार्मिक सोहळा अधिकच आकर्षक आणि प्रेरणादायी ठरला.महादेवांच्या कृपेने गावात सदैव आनंद,ऐक्य आणि भरभराट नांदो,अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई वार्ताहर** : आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन २०२६ निमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल, नवी मुंबई येथे परिचारिकांच्या रुग्णसेवेतील योगदानाचा गौरव करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आमच्या परिचारिका, आमचे भविष्य; सशक्त परिचारिका एखाद्याचा अमूल्य जीव वाचवतात (Our Nurses. Our Future. Empowered Nurses Save Lives) या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात परिचारिकांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला. संदिप जोशी(केंद्र प्रमुख, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबई) ,नीरज लाल(मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे महाराष्ट्र आणि कर्नाटक विभागाचे प्रादेशिक



संचालक) यांच्या नेतृत्वाखाली हा यशस्वी उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी परिचारिकांना वैयक्तिक शुभेच्छापत्रे, गुलाबपुष्प, चॉकलेट्स, भेटवस्तू आणि त्यांनी केलेल्या दिर्घकाळ सेवेसाठी त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत, नृत्य, खेळ आणि टीम-बिल्डिंग उपक्रमांमुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी रुग्णांच्या कठीण काळात परिचारिका केवळ वैद्यकीय सेवा नव्हे तर मानसिक आधार आणि दिलासाही देतात, असे मत रुग्णालय प्रशासनाने व्यक्त केले. परिचारिकांना त्यांच्या कामासाठी प्रोत्साहन आणि योग्य तो सन्मान मिळावा, यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमामुळे परिचारिकांमध्ये आनंद, आपलेपणा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# गणिताची भीती होणार दूर

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : शालेय शिक्षण असो किंवा शालेय शिक्षणानंतर नोकरीसाठी असलेली धडपड असो प्रत्येक विद्यार्थ्याला स्पर्धा परीक्षांना तोंड द्यावे लागते. स्पर्धा परीक्षा म्हटलं तर विद्यार्थ्यांच्या मनातील सर्वात मोठी भीती ती म्हणजे गणिताची. स्पर्धा परीक्षांमध्ये गणित हा विषय अति महत्त्वाचा मानला जातो कारण गणितातील काही प्रश्न वेगवेगळ्या पद्धतीने विचारले जातात. विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता आणि त्यांची तलक बुद्धी तसेच प्रश्न सोडवण्याची क्षमता ह्या सर्व गोष्टी गणिताच्या पार्श्वभूमीवर ठरवले जाते. आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग लाखनी चे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी विद्यार्थ्यांची ही समस्या खूप जवळून अनुभवली आहे. या समस्येचे योग्य निराकरण म्हणून विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच स्पर्धा परीक्षा आणि त्यामधील गणिताचं योग्य ज्ञान देण्याच्या उद्देशाने त्यांनी यावर्षीच्या




भविष्य समर ट्रेनिंग मध्ये स्पर्धा परीक्षेचा मार्गदर्शन आणि गणिताविषयीची भीती दूर करण्याचा हेतूने आणि भविष्यात कुठल्याही विद्यार्थ्याला कसलाही समस्येच्या सामना करायची हिम्मत देणे हेतू स्पर्धा परीक्षा बेसिक फाउंडेशन या अति महत्त्वाच्या आणि उत्कृष्ट ट्रेनिंगचा सहभाग केला आहे. स्पर्धा परीक्षांचा संपूर्ण सखोल ज्ञान आणि गणिताची संपूर्ण भीती दूर करण्याच्या हेतूने या या ट्रेनिंगचा संपूर्ण कारभार 14 वर्षांचा अनुभव असलेले, खूप विद्यार्थ्यांना सरकारी नोकरी ज्यांनी मिळवून दिलं, बसच्या प्रवासामधून ज्यांनी स्वतःचा गणित उत्कृष्ट दर्जास बनवलं आणि आजही खूप विद्यार्थ्यांचे भविष्य घडवत आहेत असे सहयोग कोचिंग अँड कॉम्पिटिटिव्ह अकॅडमी उमरेड आणि सहयोग बहुउद्देशीय संस्था नागपूर चे संचालक श्री प्रतीक जी जामगडे सर. लहानपणापासूनच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची जाणीव त्याची ओळख आणि त्यासाठी त्यांची पूर्वतयारी आणि गोरगरिबांच्या मुलांना एक उच्च स्तरावर नेण्याच्या जो आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग लाखनी च्या संचालकांच म्हणजेच श्री निहाल वालदे सरांचं जो उद्देश आहे त्या उद्देशाला साथ देत श्री प्रतीक जामगडे सरांनी आपला मोलाचे योगदान दिलेला आहे. प्रतीक सर खूप वर्षापासून गणिताचं प्रशिक्षण देतात वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांमध्ये खूप विद्यार्थ्यांना त्यांनी मदत केली आहे आणि यावर्षी सुद्धा आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग ने आयोजित केलेल्या भविष्य समर ट्रेनिंग मध्ये सुद्धा प्रतीक सर आपलं वेळ देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत आणि स्पर्धा परीक्षांमध्ये गणिताचा जो महत्त्वाचा टप्पा असतो त्या टप्प्याला समजावून विद्यार्थ्यांच्या मनातून गणिताची भीती काढून त्यांना स्पर्धा परीक्षांसाठी तयार करण्याचा बिळा उचलला आहे. आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग लाखनी चे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी या कोचिंगला लाभलेले प्रशिक्षक श्री प्रतीक जी जामगडे सर तसेच श्री अमित सवयी सर आणि इतर प्रशिक्षकांचं आभार मानलेला आहे. लाखनी तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी या ट्रेनिंगचा आणि या प्रशिक्षकांसोबत वेळ घालवण्याची ही ही सुवर्णसंधी गमावू नये असे निवेदन श्री निहाल वालदे सरांनी केल आहे. अधिक माहितीसाठी नक्की संपर्क करा आणि आपल्या तालुक्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांना आणि प्रत्येक पालकांना जागरूक करा.

# एचटीबीटी तंत्रज्ञानाला जलदगतीने परवानगी द्या - दिपक आनंदवार

## शेकडो शेतकऱ्यांसह शेतकरी संघटनेने मुख्यमंत्री यांच्या कडे केली मागणी

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर** : वाढता उत्पादन खर्च आणि तण नियंत्रणासाठी लागणाऱ्या मजुरांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी एचटीबीटी कापूस बियाणे तंत्रज्ञानाला शासनाने मान्यता द्यावी, अशी मागणी शेतकरी संघटनेचे दीपक आनंदवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन दिग्रस तहसील चे तहसीलदार मयुर राऊत यांच्या मार्फत सादर देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, यवतमाळ जिल्ह्यात खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद व इतर पिकांची लागवड केली जाते. या पिकांमध्ये तण




नियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणावर मजुरांची आवश्यकता भासते. मात्र सध्या मजुरांची कमतरता असल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

शेतकरी संघटनेच्या मते, एचटीबीटी कापूस लागवडीमुळे तणनाशक फवारणी सुलभ होत असून उत्पादन खर्चात मोठी बचत होते. पारंपरिक कापूस शेतीमध्ये तण काढण्यासाठी वारंवार निंदण करावे लागते. एका एकरासाठी अनेक मजुरांची गरज भासते, त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च वाढतो. याउलट एचटीबीटी कापूस पद्धतीत तण नियंत्रण अधिक प्रभावीपणे करता येते.

निवेदनात असेही म्हटले आहे की, यवतमाळ जिल्ह्यातील मोठ्या क्षेत्रावर अनधिकृतपणे एचटीबीटी कापसाची लागवड केली जात आहे.

शेतकरी मागील अनेक वर्षांपासून हे बियाणे वापरत असून त्यांना त्याचा फायदा होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच एचटीबीटी कापसामुळे मजुरांची टंचाई कमी होऊन शेतीचे व्यवस्थापन सुलभ होत असल्याचेही नमूद करण्यात आले.

शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून एचटीबीटी कापूस बियाण्यांना अधिकृत मान्यता द्यावी, तण नियंत्रणासाठी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे या मोर्चा चे आयोजन व नेतृत्व दीपक आनंदवार यांनी केले या वेळी मिलिंद दामले,विजय निवल,राजेंद्र झोटिंग,देवेंद्र राऊत व इत्यादि शैकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील शिक्षिकेची दमदार कामगिरी; ३०५ किलो वजन उचलत सुवर्णपदकावर नाव

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : युनायटेड पॉवरलिफ्टिंग असोसिएशनतर्फे नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत निफाड तालुक्यातील ग्रामीण भागातील शितल ढोमसे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत अजिंक्यपद पटकावले. वयाच्या चाळीशीतही जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी 84 किलो वजनी गटात एकूण 305 किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

या स्पर्धेत शितल ढोमसे यांनी डेडलिफ्टमध्ये 130 किलो, बेंच प्रेसमध्ये 55 किलो वजन उचलले. फुल पॉवरलिफ्टिंग प्रकारात त्यांनी एकूण 305 किलो वजन उचलत सुवर्णपदकावर यशस्वीरित्या आपले नाव कोरले. त्यांच्या या यशामुळे निफाड तालुक्यासह




ग्रामीण भागात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्पर्धेनंतर झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात पल्लवी गोस्वामी यांच्या हस्ते पॉवरलिफ्टिंगचे सुवर्णपदक, उदय वाल्मिकी यांच्या हस्ते बेंच प्रेसचे सुवर्णपदक तर श्रीब गोस्वामी यांच्या हस्ते डेडलिफ्टचे सुवर्णपदक प्रदान करून शितल ढोमसे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे जनरल सेक्रेटरी श्रीबास गोस्वामी, नाशिक जिल्हाध्यक्ष विनोद गांगुर्डे, सचिव अक्षय रानडे, ज्ञानेश्वर ढोमसे, नागपुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

शितल ढोमसे यांनी संसाराची जबाबदारी सांभाळत शिक्षणाची जिद्द कायम ठेवली. त्यांनी शिक्षकी पेशात पदार्पण करून गेल्या तेरा वर्षांपासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे पवित्र कार्य सुरू ठेवले आहे. शिक्षक म्हणून जबाबदारी पार पाडत असतानाच त्यांनी स्वतःच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देत फिटनेस आणि पॉवरलिफ्टिंग क्षेत्रात पाऊल टाकले. वयाच्या चाळीशीत सुरू केलेला हा प्रवास आज राज्यस्तरीय यशापर्यंत पोहोचला आहे.

आजपर्यंत त्यांनी दोन वेळा जिल्हास्तरीय, दोन वेळा राज्यस्तरीय तसेच दोन वेळा राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदके मिळवली आहेत. याशिवाय कल्याण येथे झालेल्या ओपन डेडलिफ्ट चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक, नाशिक येथील एएस ओपन डेडलिफ्ट चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक, वन लाईफ फिटनेस ओपन डेडलिफ्ट स्पर्धेत सुवर्णपदक तसेच व्ही.एस.के. ओपन डेडलिफ्ट स्पर्धेत रौप्यपदक पटकावत त्यांनी सातत्यपूर्ण यशाची परंपरा कायम राखली आहे.

ग्रामीण भागातील महिलांसाठी शितल ढोमसे या प्रेरणास्थान ठरत असून संसार, नोकरी आणि खेळ यांचा उत्तम समतोल साधत त्यांनी महिलांनी इच्छाशक्तीच्या बळावर कोणतेही क्षेत्र गाठता येते हे सिद्ध करून दाखवले आहे.

# उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी मुंबईतील सिग्नलवर उभारले मंडप

**दैनिक युवक आधार**

**धुरी (मुंबई दादर) प्रतिनिधी:- मयूर प्रकाश** : सध्या वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर दादर टीटी सर्कल येथे रोज हजारो प्रवासी, दुचाकीस्वार आणि नागरिक सिग्नलवर उभे राहतात. या कडक उन्हापासून त्यांना थोडा दिलासा मिळावा या उद्देशाने दादर टी टी परिसरातील सिग्नलवर तात्पुरत्या स्वरूपात Heat Shelter ची उभारणी करण्यात आली आहे.



या उपक्रमामुळे सिग्नलवर थांबणाऱ्या नागरिकांना सावली मिळून उष्णतेचा त्रास कमी होईल आणि त्यांच्या आरोग्याचे संरक्षण होण्यास मदत होईल.

याच धर्तीवर वडाळा विधानसभा क्षेत्रात आणखी ९ ठिकाणी Heat Shelters उभारण्याचे नियोजन करण्यात आले असून लवकरच तेही कार्यान्वित करण्यात येतील, जेणेकरून अधिकाधिक नागरिकांना या उपक्रमाचा लाभ मिळेल असे हा उपक्रम राबविणारे स्थानिक नगरसेक अमेय घोले यांच्या कडून सांगण्यात आले .

# भिवराज कलंत्री नर्सिंग इन्स्टिट्यूट सिडको नांदेड येथे जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नांदेड ग्रामीण तालुका प्रतिनिधी : संभाजी सूर्यवंशी** : भीवराज कलंत्री नर्सिंग इन्स्टिट्यूट सिडको नांदेड येथे आज जागतिक परिचारिका दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुरेखा कलंत्री ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक डॉ.अशोक कलंत्री, प्राचार्य राजकुमार कुंभार , प्रा. संभाजी सूर्यवंशी, सपना नांदेडकर ह्या उपस्थित होत्या.

परिचारिकेची जननी फ्लारेंस नाईटीगेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण



करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस परिचारिकेची जननी हिच्या कार्याबद्दल चे गौरव गीत धम्मश्री सावते हिने गायले. व त्यानंतर तेजस्विनी दाढेल , भक्ती गोरठकर,राजनंदनी वने ,पौर्णिमा वने, श्रेया देवकते, रमा मस्के, करुणा सूर्यवंशी,परिचारिका आपले मनोगत याप्रसंगी व्यक्त केले.

डॉ. अशोक कलंत्री यांनी परिचारिकेचे कार्य, परिचारिका येत असलेल्या अडचणी आणि त्यावर कशाप्रकारे मात करता येईल याबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले.

ज्याप्रमाणे मेणबत्ती स्वतः जळून इतरांना प्रकाश देण्याचे कार्य करते, अगदी त्याचप्रमाणे परिचारिका आपले सर्व दुःख विसरून,आपल्या समस्या विसरून रुग्णाच्या जीवनामध्ये प्रकाश आणण्याचे मोलाचं कार्य करत असतात असे प्रतिपादन प्रा. संभाजी सूर्यवंशी यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्षा डॉ. सुरेखा कलंत्री यांनी आपले मनोगत व्यक्त करत परिचारिकांचे नैतिक मूल्य,परिचारिकेची जबाबदारी आणि एक परिचारिका काय करू शकते याबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले.

# जी. संजीवा रेड्डी यांच्याशी दिल्लीत महेंद्रशेठ घरत यांनी अन्यायकारक कामगार कायद्यांवर केली चर्चा!

**दैनिक युवक आधार**

**दिल्ली, प्रतिनिधी** : कामगार चळवळीचे भीष्माचार्य म्हणून संबोधले जाणारे डॉ. जी. संजीवा रेड्डी यांच्याशी आयटीएफचे (लंडन) एक्झिक्युटिव्ह बोर्ड मेंबर आणि इंटकचे राष्ट्रीय सचिव, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी मंगळवारी (ता. १२) दिल्लीत संवाद साधला. यावेळी आयटीएफचे आशिया-पॅसिफिक विभागाचे नवनियुक्त डेप्युटी प्रादेशिक सेक्रेटरी अब्दुल गणी सारंग, आयटीएफचे एक्झिक्युटिव्ह बोर्ड मेंबर शिवगोपाल मिश्रा उपस्थित होते. या सर्वांनी केंद्र सरकार कामगारांवर लादू पाहत असलेले चार लेबर कोड आणि



त्यांचे कामगारांवर होणारे गंभीर परिणाम याविषयी डॉ. जी. संजीवा रेड्डी यांच्याशी चर्चा केली आणि पुढील रणनीती ठरविण्यात आली.

भारतीय राष्ट्रीय कामगार संघ काँग्रेसची (इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस) स्थापना १९४७ मध्ये झाली. कामगारांच्या न्याय हक्कांसाठी लढणारी ही देशातील सर्वाधिक जुनी कामगार संघटना आहे. सुमारे ३.५० कोटी कामगारांचे नेतृत्व संघटनेकडे आहे. देशातील बलाढ्य ९ भारतीय केंद्रीय कामगार संघटनांच्या कृती समितीचे जी. संजीवा रेड्डी हे अध्यक्ष आहेत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाशी निगडित ही संघटना आहे. संघटनेचे सध्याचे अध्यक्ष डॉ. जी. संजीवा रेड्डी हे ९५ वर्षांचे आहेत. त्यांनी आपली हयात कामगारांच्या भल्यासाठी घालवली आहे. भारतीय कामगार चळवलीला त्यांनी खऱ्या अर्थाने दिशा आहे.

आयटीएफचे आशिया-पॅसिफिक विभागाचे डेप्युटी प्रादेशिक सेक्रेटरी अब्दुल गणी सारंग यांची नव्याने निवड झाल्याबद्दल महेंद्रशेठ घरत यांनी त्यांचे अभिनंदन केले. आणि डॉ. जी. संजीवा रेड्डी यांनाही पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

# पाथरी पुनर्वसन येथे माया पिरॅमिड केंद्राचे उद्घाटन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** -पवनी तालुक्यातील पाथरी पुनर्वसन येथे माया पिरॅमिड ध्यान केंद्राचे उद्घाटन आज दिनांक 10 मे 2026 ला सकाळी 11 वाजता करण्यात आले. सदर पिरॅमिड ध्यान केंद्राचे उद्घाटन डॉ. चारमोडे गंगोत्री पिरॅमिड सेंटर लाखनी, हिरा बांगडे राजनांदगाव, माया पिरॅमिड केंद्राचे संचालक सोमेश्वर गोस्वामी,सौ. ललिता लांजेवार ,जया कपाले, वैशाली डरवाल ,खोब्रागडे मॅडम, रश्मी पांडे,राजश्री कुसरे,गजानन गाऊत्रे ,नारायण खापेकर ,ॲडव्होकेट संतोष लांजेवार, खोब्रागडे मॅडम,नागपूर,यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. सदर ध्यान केल्यामुळे तन स्वस्थता होते, मनाची शांती ,बुद्धीचा विकास, आत्म्याला आनंद मिळतो. सदर ध्यान केंद्राच्या ग्रामीण व शहरी



भागात प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने या ध्यान साधना केंद्राची सुरुवात करण्यात आलेली आहे. कार्यक्रमाचे संचालन एडवोकेट संतोष लांजेवार यांनी केले तर आभार गजानन गोत्रे नागपूर यांनी मानले.यावेळी बऱ्याच संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते व सहभोजनाची सुद्धा व्यवस्था करण्यात आली होती.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी कोंकण विभाग सज्ज: आयुक्त रुबल अग्रवाल

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : "आपत्ती काळात सर्व यंत्रणांनी नागरिकांच्या तक्रारी आणि अडचणींना तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी अचूक नियोजन करावे, कार्य व बचाव साहित्य तात्काळ घटनास्थळी पोहचेल, याची खातरजमा करावी. तसेच आपत्ती व्यवस्थापनेबाबत नागरिकांना आवश्यक माहितीचा प्रचार व प्रसिध्दीवर विशेष भर द्यावा, असे निर्देश कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी दिले. पावसाळा पूर्वीच्या आपत्ती व्यवस्थापन तयारीचा आढावा घेताना दूरदृष्यप्रणालीद्वारे कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांसह विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिलेआहेत.

या बैठकीस ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर, सिंधुदूर्ग, मुंबईचे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी ,महानगरपालिका आयुक्त, नगरपालिका अधिकारी, जिल्हा परिषद अधिकारी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, कोकण रेल्वे, एसटी महामंडळ, नागरी संरक्षण, हवामान विभाग व औद्योगिक आरोग्य सुरक्षा विभागातील अधिकारी उपस्थित होते.यावेळी आयुक्त रुबल अग्रवाल म्हणाल्या की, कोकणात पावसाळ्यापूर्वी अचूक नियोजनाची आवश्यकता आहे. पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी नाले सफाई, रस्ते दुरुस्ती, झाडांची छाटणी अशी कामे पूर्ण करुन घेण्यात यावी.

कोकण विभागीय स्तरावर चोवीस तास नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून, सर्व जिल्हा आणि तालुका स्तरावरही अशाच प्रकारचे अहोरात्र नियंत्रण कक्ष सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून संबंधित प्राधिकरणाकडून मंजूरी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शहरातील नालेसफाईची कामे ३१ मे २०२६ पूर्वी १००% पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या, तसेच,अतिधोकादायक आणि बेकायदेशीर इमारतींमधील रहिवाशांच्या सुरक्षित स्थलांतराचे नियोजन तातडीने करण्याचे निर्देश महापालिका आयुक्तांना देण्यात आले आहेत.

कोकणात शोध व बचाव पथके कार्यरत असून त्यात प्रशिक्षित सदस्य आहेत. या सदस्यांनी "आपदा मित्र" उपक्रमांतर्गत तालुका व जिल्हास्तरीय प्रशिक्षण घेतले आहे. आपत्ती व्यवस्थापनाच्या साहित्यांची चाचणी घेण्यासाठी मॉक ड्रिल्स राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कोकण विभागात 09 मोठे, 09 मध्यम प्रकल्प आणि 143 लघु प्रकल्प अशी धरणे आहेत.पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टीमुळे धरणे



भरल्यास, नियोजित पद्धतीने पाण्याचा विसर्ग करावा व नागरिकांना वेळीच इशारा द्यावा. यासाठी स्थानिक प्रशासनाने (उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नगरपालिका) जलद प्रतिक्रिया देण्यासाठी नियंत्रण कक्ष सुरू करावा. विसर्गाच्या आधी संबंधित यंत्रणांना सूचना देणे आवश्यक आहे, विशेषतः जेथे पाण्याचा धोका संभवतो. धबधब्यांच्या ठिकाणी जाणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नियोजन करावे. अशा ठिकाणी जवळपासच्या रिसॉर्ट, हॉटेल मध्ये साहसी खेळांवर बंदी आणावी, अशा ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

पावसाळ्यात पूर, दरड कोसळणे, वीज कोसळणे, चक्रीवादळ, झाडे/इमारती कोसळणे, रस्ते बंद होणे, या घटना घडतात. अशा वेळी जेसीबी, डंपर, वूड कटर, ट्रक अशी यंत्रसामग्री तात्काळ उपलब्ध ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. बाधित नागरिकांना स्थलांतर करण्यासाठी शाळा, मंदिर, हॉल इ. ठिकाणे निवासासाठी सज्ज ठेवावी व पाणी, अन्न, वैद्यकीय सुविधा पुरवाव्यात. धरणातील पाण्याचा विसर्ग नियोजित पद्धतीने करावा व स्थानिक प्रशासनाने विसर्गापूर्वी नागरिकांना वेळीच इशारा द्यावा. एनडीआरएफ च्या तुकडयांना तैनात ठेवावे. त्यांचे संपर्क क्रमांक अद्यावत ठेवावे. रेल्वे व रस्ते वाहतुकीस अडथळा झाल्यास पर्यायी वाहतुकीसाठी महाराष्ट्र परिवहन महामंडळाशी समन्वय साधावा, असेही त्या म्हणाल्या. त्या म्हणाल्या की, पावसाळ्यात साथीचे रोग वाढू शकतात. यासाठी औषधांचा साठा, पाण्याचे शुद्धीकरण, साथरोग नियंत्रण कक्ष स्थापनेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. नागरी संस्थांनी नियमितपणे पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासून नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे.

सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, तहसील कार्यालये आणि महानगरपालिका स्तरावर २४x७ आपत्ती नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कक्षात संगणक, इंटरनेट, ई-मेल, दूरध्वनी, हॉटलाईन सेवा उपलब्ध असावी.

आपत्तीशी संबंधित कोणतीही माहिती तात्काळ शासनाला कळवावी. नागरिकांच्या तक्रारी आणि अडचणींना तात्काळ प्रतिसाद द्यावा, अशा सूचना आयुक्त रुबल अग्रवाल यांनी यावेळी दिल्या.

यावर्षी देशात नैऋत्य मान्सूनचे प्रमाण सामान्यपेक्षा थोडे कमी म्हणजे सुमारे 92% (LPA) राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात हवामान विभाग अधिक अद्ययावत अंदाज प्रसिद्ध करेल, तरीही प्रशासनाने कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी तयार राहावे, असे आवाहन रुबल अग्रवाल यांनी यावेळी केले.

अडकलेल्या किंवा आपत्तीग्रस्त नागरिकांना मदत करण्यासाठी जेसीबी, बोट्स आणि प्रशिक्षित मनुष्यबळ अर्ध्या तासाच्या आत घटनास्थळी पोहोचेल, याची खातरजमा करण्याचे आदेशही यावेळी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

**कोकण विभागातील आपत्ती नियंत्रण कक्षाचे क्रमांक.**

**जिल्हा दूरध्वनी नियंत्रण कक्ष-दूरध्वनी क्रमांक**

1)मुंबई शहर 022-22664232 08657106273

2) मुंबई उपनगर 022-69403344 08104729077

3)मुंबई उपनगर 022-69403344 08104729077

4) ठाणे 022-25301740 09372338827

5) पालघर 02525-297474 08237978873

6)रायगड 0241-222118/227452 0875152363

7) रत्नागिरी 02352-222233 07057222233

8)सिंधुदुर्ग 02362-228847 07498067835

9)मंत्रालय कंट्रोल रुम 022-22027990/022-22794229/09321587143

# पोलादपूर नगरपंचायतीसाठी घेण्यात येणाऱ्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : पोलादपूर नगरपंचायतीसाठी घेण्यात येणाऱ्या पोट निवडणूकीच्या संबंधात कार्यक्रम जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जाहिर केला असून तो पुढीलप्रमाणे आहे.

प्रभागाचे नाव व क्रमांक-1 निवडणुक निर्णय अधिकाऱ्याचे नाव-महेश शितोळे, तहसिलदार, महाड, तहसिल कार्यालय महाड, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकाऱ्याचे नाव- विनय शिपाई, मुख्याधिकारी, पोलादपूर नगरपंचायत, नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचा कालावधी- दि. 18/05/2026 (सोमवार) तेदि.25/05/2026 (सोमवार), (सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 कालावधीत) (दि.23/05/2026 शनिवार व दि.24/05/2026 रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्रे स्विकारण्यात येणार नाहीत),

नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याचे ठिकाण- तहसिल कार्यालय पोलादपूर, ता. पोलादपूर, जि. रायगड, नामनिर्देशन पत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा



दिनांक- दि.26/05/2026 (मंगळवार) सकाळी 11:00 वाजेपासून,नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा कालावधी अपील नसेल तेथे- दि.27/05/2026 (बुधवार) तेदि.02/06/2026 (मंगळवार) सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 वाजेपर्यंत (दि.28/05/2026 गुरुवार, दि.30/05/2026 शनिवार वदि.31/05/2026 रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्रे मागे घेता येणार नाहीत,

अपिल असल्यास वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आज जिल्हा न्यायाधीशांकडे अपील करता येईलअपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यांत येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वीकार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 कालावधीत मात्रदि.11/06/2026 (गुरुवार) सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यंत नामनिर्देशन पत्राची छाननी करण्याची व ते मागे घेण्याचे ठिकाण- तहसिल कार्यालय पोलादपूर, ता. पोलादपूर, जि. रायगड, निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक- (अपील नसेल तेथे) दि.02/06/2026 (मंगळवार) रोजी दुपारी 03.00 वाजेनंतर (अपील असल्यास) :दि.11/06/2026 (गुरुवार) रोजी दुपारी 03.00 वाजे नंतर आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक दि.20/06/2026 (शनिवार) सकाळी 7.30 पासून ते सायंकाळी 5.30 पर्यंत मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक 21/06/2026 (रविवार) सकाळी 10.00 वाजल्या पासून , मत मोजणीचे ठिकाण- तहसिल कार्यालय पोलादपूर, ता. पोलादपूर, जि. रायगड, महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करणे- दि.23/06/2026 (मंगळवार) कलम 19 मधील तरतुदीनुसार.

# अलिबाग तालुक्यातील भिलजी गावच्या सुकन्येचा गौरव : हभप अश्विनी भोईर यांना 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६' प्रदान

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : पत्रकार मित्र संघ आणि मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमी रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने, महाराष्ट्राची संस्कृती आणि प्रगतीत मोलाचे योगदान देणाऱ्या रत्नतुल्य व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ८ मे २०२६ रोजी पेण एज्युकेशन सोसायटी, पेण येथे पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्यात, वारकरी संप्रदायातील हभप अश्विनी भोईर यांना सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले.

अलिबाग तालुक्यातील भिलजी या छोट्याशा गावात जन्मलेल्या अश्विनी भोईर यांना बालपणापासूनच आई-वडिलांकडून भक्तीचे बाळकडू मिळाले आहे. त्यांचे वडील हभप कृष्णा झावरे यांनी पंचक्रोशीत वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ रोवली होती. विशेष म्हणजे, अश्विनीताईंच्या या आध्यात्मिक प्रवासात त्यांचे पती नितीन भोईर यांचेही मोठे योगदान आणि प्रोत्साहन आहे. नितीन भोईर हे स्वतः उत्तम पखवाज वादक असून वारकरी



संप्रदायात त्यांचेही कार्य मोलाचे आहे. पती-पत्नीच्या या जोडीमुळेच घराण्यात भक्तीचा हा सुगंध दरवळत आहे.

हभप अश्विनी भोईर यांच्या ओठावर जणू सरस्वतीची वाणी वसलेली आहे. त्यांच्या रसाळ कीर्तनाचा लाभ केवळ महाराष्ट्रालाच नाही, तर झी टॉकीज (झी टीव्ही) वरील 'नाचू कीर्तनाचे रंगी' या लोकप्रिय कीर्तन मालिकेतून जगभरातील हजारो श्रोत्यांनी घेतला आहे. ग्रामीण भागातून येऊन आपल्या वाणीच्या जोरावर वारकरी संप्रदायाचा संदेश साता समुद्रा पार पोहोचवणाऱ्या कराडी समाजाच्या या सुकन्येचा सन्मान होणे ही संपूर्ण समाजासाठी भुषणावह गोष्ट आहे.

हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपल्या नम्र भावना व्यक्त करताना अश्विनीताई म्हणाल्या, "हा सन्मान माझा नसून पांडुरंगाच्या चरणी सेवा करणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याचा आहे वारकरी संप्रदाय ही एक जीवन पद्धती असून साहित्याचा डिजिटल प्रसार करणाऱ्या वर माझा भर आहे. अश्विनी भोईर यांच्यासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एकूण ७७गुणवंताना यावेळी सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमासाठी अरुण शिर्के, मंगेश नेने, राजू पिचीका, प्रीतम पाटील, हंसी राज कपूर बागडी, विशाल जाधव यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# "साईबाबा बोलो" : श्रद्धा, संस्थान, राजकारण आणि अंधश्रद्धेवर परखड भाष्य

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : शिर्डीतील साईबाबांच्या भक्तीभोवती उभ्या राहिलेल्या प्रचंड धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेचा वेध घेताना हा लेख अनेक अस्वस्थ करणारे प्रश्न उपस्थित करतो. संस्थानचा कारभार, ट्रस्टींवरील भ्रष्टाचाराचे आरोप, राजकीय हस्तक्षेप, न्यायालयीन लढाया आणि भक्तांच्या अढळ श्रद्धेच्या आड सुरू असलेल्या व्यवस्थेचे वास्तव यावर या लेखात परखड भाष्य करण्यात आले आहे.

संस्थानच्या व्यवस्थापनात काळानुसार अनेक वाद, चौकशा आणि प्रशासनिक बदल झाले. ट्रस्टच्या कारभारात भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि राजकीय हस्तक्षेपाच्या आरोपांमुळे सरकारी हस्तक्षेपही झाला. स्थानिक राजकारण आणि धार्मिक संस्थांमधील सत्तासंघर्ष कसा आकार घेत गेला, याची उदाहरणांसह मांडणी यात आहे.लेखात अनेक राजकीय नेत्यांच्या शिर्डी भेटींचा उल्लेख करत श्रद्धा आणि राजकारण यातील संबंधांवर उपरोधिक टिप्पणी करण्यात आली आहे. तसेच संस्थान आणि स्थानिक गावकरी यांच्यातील संघर्ष, मंदिर परिसरातील व्यावसायिक अतिक्रमणे, विस्तारकामे आणि त्यातून निर्माण झालेले न्यायालयीन प्रश्न यांचाही आढावा घेण्यात आला आहे.

भक्तांच्या भावनिक श्रद्धेचा उपयोग करून चमत्कार, रोगमुक्ती, नवसपूर्ती आणि अध्यात्माच्या नावाखाली उभ्या राहिलेल्या व्यापक व्यवस्थेवरही लेख प्रश्न उपस्थित करतो. इंटरनेट, जागतिक भक्तवर्ग, देणग्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून धार्मिक प्रभाव कसा वाढवला जातो, याचे निरीक्षणही यात नोंदवले आहे.

लेखाच्या उत्तरार्धात श्रद्धा, मानसिक आधार, अंधविश्वास आणि व्यक्तीच्या स्वावलंबनातील संघर्ष यावर गंभीर सामाजिक भाष्य केले आहे. धार्मिक स्थळांवरील भावनिक गुंतवणूक, चमत्कारांवरील विश्वास आणि विवेकबुद्धीपासून दूर जाणारी सामाजिक मानसिकता यावर लेखकाने तीक्ष्ण निरीक्षणे नोंदवली आहेत.

हा लेख श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सीमारेषा, धार्मिक संस्थांचे वास्तव आणि समाजाच्या मानसिकतेवर विचार करायला भाग पाडणारा ठरतो.

**— डॉ. प्रदीप पाटील, सांगली (विशेषांक १९९९) (महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती प्रकाशित 'समग्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती – अंनिवा' खंड २, भाग ७ मधील "साईबाबा बोलो" या प्रकरणावर आधारित)**

# बारामतीत मायलेकाने एकाच वेळी दहावी उत्तीर्ण

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत बारामती तालुक्यातील उंडवडी क.प. येथील मायलेकाने एकाच वेळी परीक्षा देऊन यश संपादन केले आहे. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांपैकी प्रणव रामदास सरक याने 71.60 टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला.तर त्याची आई सौ.वैशाली रामदास सरक यांनी वयाच्या ३७ व्या वर्षी दहावीची परीक्षा देऊन 72.40 टक्के गुण मिळवत मुलापेक्षा एक टक्का अधिक गुण मिळवले. त्यामुळे आईने मुलाला मागे टाकत बाजी मारली आहे. या अनोख्या यशामुळे उंडवडी क.प.परिसरात मायलेकाचे सर्वत्र कौतुक होत आहे.सौ.वैशाली सरक या सध्या बारामतीत खाजगी नोकरी करत



असून अपुऱ्या शिक्षणामुळे जीवनप्रवासात आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांनी पुन्हा शिक्षण घेतले.आपल्या मुलाला इंजिनीअर बनवण्याचा त्यांचा निर्धार असून घरची परिस्थिती साधारण असतानाही त्या मुलाच्या शिक्षणासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. त्या उंडवडी क.प.च्या माजी ग्रामपंचायत सदस्या आहेत. या प्रेरणादायी घटनेमुळे आई-मुलाच्या जिद्दीचे आणि शिक्षणावरील निष्ठेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बियरच्या बाटलीने मारहाण करून केले जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : दारू पिण्याच्या कारणावरून झालेल्या वादात बियरच्या बाटलीने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी आरोपी सुशील सुनील मस्के (राहणार झोपडपट्टी कोपरा गाव, खारघर) याच्या विरोधात दहा मे रोजी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील फिर्यादी आणि आरोपी सुशील मस्के हे सात मे रोजी झोपडपट्टी सुवर्ण गंगा सिग्नल, कोपरगाव, खारघर येथे दारू पीत होते. यावेळी दारू पिण्याच्या कारणावरून झालेल्या वादात सुशील याने त्यांना बियरच्या बाटलीने मारहाण केली.

**सोन्याची चैन चोरली**

नवीन पनवेल : बसने प्रवास करत असताना 58 वर्षीय इसमाच्या गळ्यातील दोन तोळे वजनाची सोन्याची चैन चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकरा मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी बळराज पवार (राहणार महाड, तांबड भवन) हे 10 मे रोजी नऊच्या सुमारास पनवेल बस स्टँड ते महाड असा प्रवास करत होते. यावेळी चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन चोरून नेली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

पती विरोधात गुन्हा दाखल

नवीन पनवेल : पत्नीला धमकी देत मानसिक आणि शारीरिक त्रास दिल्या प्रकरणी पतीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकरा मे रोजी गुन्हा दाखल करण्यात यातील फिर्यादी 32 वर्षीय असून आरोपी पती 34 वर्षीय आहे. 19 सप्टेंबर 2025 पासून 32 वर्षीय पत्नी त्यांच्या पतिसोबत राहत असताना पतीने त्यांना शिवेगाळ केली आणि धमकी देऊन त्यांच्यासोबत रहायचे नाही म्हणून मानसिक आणि शारीरिक त्रास दिला.

# जळगाव रेक पॉईंटवरून खत पुरवठ्याला मंजुरी ; जि .प .सदस्या सौ .पुष्पाताई काळे यांना यश,शेतकऱ्यांना दिलासा

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव,सिल्लोड व कन्नड तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामात युरिया,डीएपी तसेच इतर रासायनिक खतांच्या टंचाईचा सामना करावा लागत होता. शेतकऱ्यांना वेळेवर खत उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हा परिषद सदस्या सौ. पुष्पाताई प्रकाश काळे यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.त्यांच्या प्रयत्नांना यश येत विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी आर.सी.एफ. कंपनीकडे जळगाव येथील रेक पॉईंटवरून खत पुरवठा करण्याबाबत अधिकृत पत्र पाठविले आहे. या पत्रानुसार NFL, नर्मदा बायो केम व IPL कंपनीमार्फत येणाऱ्या खत रेकमधून सुमारे ३०० मेट्रिक टन खत जिल्ह्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.



पूर्वी छत्रपती संभाजीनगर येथून खत पुरवठा होत असल्याने सोयगाव, सिल्लोड व कन्नड तालुक्यात खत पोहोचण्यास विलंब होत होता. मात्र आता जळगाव येथून थेट पुरवठा झाल्यास युरिया, डीएपी व इतर खते वेळेत उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.या कामासाठी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मा. जितेंद्र जैस्वाल यांचेही विशेष सहकार्य लाभल्याची माहिती सौ. पुष्पाताई प्रकाश काळे यांनी दिली. या निर्णयामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या उपस्थितीत नगरविकास विभागाची महत्वपूर्ण आढावा बैठक

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका वर्धा :** यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्धा येथे नगरविकास विभागासंदर्भातील विविध विषयांवर महत्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत वर्धा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध योजनांचा, प्रलंबित कामांचा तसेच आगामी विकास आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीदरम्यान शहरातील पायाभूत सुविधांचा विकास, रस्ते व नाल्यांची कामे, पाणीपुरवठा व्यवस्था, स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध प्रश्नांवर सखोल चर्चा



करण्यात आली. संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना विकासकामे निर्धारित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.यावेळी नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे, शहराचा नियोजनबद्ध विकास साधणे आणि प्रलंबित कामांना गती देणे यावर विशेष भर देण्यात आला. बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांनी विविध विकासकामांच्या सद्यस्थितीची माहिती सादर केली, तसेच आगामी प्रकल्पांबाबतही चर्चा करण्यात आली.या महत्वपूर्ण बैठकीमुळे वर्धा शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून नागरिकांच्या मूलभूत सुविधांमध्ये अधिक सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# रिसोड येथे वधू-वरांच्या हस्ते वटवृक्षारोपणं कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**रिसोड.प्रतिनिधी.रणजितसिह. ठाकुर** :आजच्या काळात विवाह सोहळा हा फक्त मुलां -मूलीकरीता नव्हे तर दोन्ही परिवारातील संपूर्ण सदस्या करीता आनंदाची पर्वणी आहे,असे म्हणने वावगे होणार नाही.नवदांपत्याचा भावी संसार सुख, समृध्दि व भरभराटीचा जावा ह्याकरिता चालत आलेल्या अनेक सामाजिक व धार्मिक परंपरेची पुर्तता केली जाते.सामाजिक व सनातन धर्म टिकविण्याच्या दृष्टिकोनातून सदर्हु परंपरा चालू ठेवणे व आजच्या पिढीला त्याची जाण करून देणे हि सर्वांकरिता अभिमानाची बाब आहे.

श्रीमद्भगवतगीतेनूसार संसार हा परिवर्तनशील आहे.त्या अनुषंगाने



वृक्षारोपण व त्याचे संगोपन हा सामाजिक व धार्मिकतेचा एक महत्वाचा भाग समजून श्री संत सातारकर महाराज संस्थान रिसोड येथे वर चि.शुभम मुलंगे व वधू चि.सौ.कां ओमश्री वाकोडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त गजानन मुलंगे ह्यांनी केले.कार्यक्रमाकरिता दत्तरावजी देशमूख अध्यक्ष,राजकूमार काळबांडे सचिव श्री संत सातारकर महाराज संस्थान रिसोड,डॉ.शुभांगी मुलंगे स्त्री रोग व प्रसूती तज्ञ महानगर पालिका पिंपरी-चिंचवड पूणे,डॉ.राजेश्वर मुलंगे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे विश्लेषण करतांना मुलंगे म्हणाले कि,लग्न सोहळयामध्ये प्रत्येक परिवार स्वतःच्या ऐपतीनुसार खर्च करत असतो.काही खर्च अर्थहीन असतात पण हा वैयक्तिक प्रश्न आहे.ध्वनिप्रदुषणाचा विचार न करता एक- एक लाख रूपये खर्च करून डी.जे.वाजविल्या जातो. फटाक्याची आतिषबाजी वर सुध्दा वारेमाप खर्च केल्या जातो.क्षणिक सुख व मौज-मस्ती म्हणून गल्लोगल्ली पेपर शॉट मुळे कचर्याचे ढिगारं जमा होत आहेत याचे कोणालाचं भान उरलेले नाही.त्या तुलनेत अगदी तूटपुंज्या खर्चात वधू-वरांच्या पालकांनी वृक्षारोपण कार्यक्रमाचे जर आयोजन केले तर दोन्ही परिवारांची सामाजिक तसेचं नैसर्गिक ऋणातून मुक्तता होईल हे निश्चित. त्यामुळे वृक्षारोपण व त्याचे संगोपन एक सामाजिक व धार्मिक दायित्व समजून प्रत्येक नवदांपत्यांनी एका देशी वृक्षाचे रोपन करून आपला देश सदाहरीत करावा असा मोलाचा सल्ला उपस्थितांना देण्यात आला कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता पूनम येसके,गणेश वाकोडे,नम्रता मिटकरी,ओम पेटकर,आरूष परमा,पुंडलीक वाघमारे,उमा घळे,आराध्या बोधेकर,श्रेया वाकोडे ईत्यादिंनी मोलाचे सहकार्य केले.

# मोहगव्हाण परिसरात अवैध दारू अड्ड्यावर एलसीबीचा धडाकेबाज छापा

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यात अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेला आणखी एक मोठे यश मिळाले आहे. वाशिम स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोहगव्हाण धरण परिसरात पहाटेच्या सुमारास धाड टाकून हातभट्टीद्वारे सुरू असलेला अवैध दारू अड्डा उद्ध्वस्त केला. या कारवाईत तब्बल साडेचार लाख रुपये किमतीचा सडवा मोह नष्ट करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, मोहगव्हाण धरण परिसरात काही व्यक्ती मोठ्या प्रमाणावर अवैध हातभट्टी दारू तयार करत असल्याची गोपनीय माहिती वाशिम स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने पहाटे सुमारे पाच वाजता घटनास्थळी छापा टाकला. पोलिसांनी परिसराची कसून पाहणी केली असता मोठ्या प्रमाणात प्लास्टिकच्या ड्रममध्ये साठवून ठेवलेला सडवा मोह, दारू गाळण्यासाठी लागणारे साहित्य आणि इतर उपकरणे आढळून आली.



कारवाईदरम्यान सुमारे साडेचार लाख रुपये किमतीचा सडवा मोह जागीच नष्ट करण्यात आला. तसेच दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्यही जप्त करण्यात आले. वाशिम पोलिसांच्या या धाडसी कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणातील दोन मुख्य आरोपी — सलीम घांसी भवानिवाले आणि मोहम्मद फिरोज नंदावाले — हे पोलिसांची चाहूल लागताच घटनास्थळावरून पसार झाले. या आरोपींविरुद्ध अनसिंग पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून दोघांचा कसून शोध सुरू असून त्यांना लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

वाशिम पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने केलेली ही कारवाई जिल्ह्यातील अवैध दारू व्यवसायाविरोधातील निर्णायक पाऊल मानली जात आहे. अवैध धंद्यांविरोधात वाशिम पोलिसांची मोहीम यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे पोलिस विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी अवैध व्यवसायांबाबत माहिती देऊन पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवली जाईल, असेही पोलिसांनी सांगितले आहे.

# IIIT नागपूरमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत भाजयुमोचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

## विद्यार्थ्याच्या आत्महत्येप्रकरणी 'क्राईम ब्रँच' तर्फे चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : ११ मे २०२६: इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (IIIT), नागपूर येथील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा, आरोग्य आणि मूलभूत सुविधांबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. संस्थेमध्ये अलीकडेच एका विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे आणि तणावाचे वातावरण आहे,या पार्श्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चा (भाजयुमो) विद्यार्थी आघाडी, नागपूर महानगरच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना भाजप नागपूर शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी व भाजयुमो नागपूर शहर अध्यक्ष सचिन करारे यांच्या



मार्गदर्शनात भाजयुमो विद्यार्थी आघाडी संयोजक शंतनु झाडे यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले.या संपूर्ण प्रकरणाची 'क्राईम ब्रँच'मार्फत निष्पक्ष चौकशी करण्यात यावी व दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली. संस्थेतील काही प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तथ्य दडपण्याचा प्रयत्न केल्यास किंवा तपासात हलगर्जीपणा आढळल्यास त्यांचीही उच्चस्तरीय चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी भाजयुमोने विविध मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करणे, विद्यार्थ्यांसाठी २४x७ वैद्यकीय सुविधा उपलब्ध करणे, मानसोपचार तज्ञ व समुपदेशकांची नियुक्ती करणे, पुरेशा वसतिगृह सुविधा पुरवणे आणि अँटी-रॅगिंग समिती अधिक प्रभावीपणे कार्यान्वित करणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. तसेच वाढत्या मानसिक तणावाचा विचार करता,'तणाव व्यवस्थापन' आणि 'मानसिक आरोग्याविषयी जागृती' या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची विनंतीही करण्यात आली आहे.निवेदन देत असतांना भाजयुमो नागपूर शहर महामंत्री रितेश पांडे, आशू गुमगावकर, यश गौर, लिखित गणवीर व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

# दत्ता पाटील यांच्या उपचाराची संपूर्ण जबाबदारी डॉ. अंकुश देवसरकर यांनी स्वीकारली

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव (यवतमाळ)** : मराठा आरक्षणासाठी सातत्याने उपोषण करून लढा देणारे सामाजिक कार्यकर्ते दत्ता पाटील यांच्या प्रकृतीत सतत बिघाड होत असल्याने समाजात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. त्यांच्या प्रकृतीसंदर्भात सोशल मीडियावर मदतीचे आवाहन करण्यात आले होते.

ही बाब समजताच नांदेड येथील भगवती हॉस्पिटलचे संचालक तथा नांदेड महानगरपालिकेचे सदस्य डॉ. अंकुश देवसरकर यांनी तात्काळ दत्ता पाटील यांना बोलावून घेतले. प्राथमिक वैद्यकीय तपासणी करून त्यांनी दत्ता पाटील यांच्या संपूर्ण उपचाराची जबाबदारी स्वीकारत मोठा दिलासा दिला आहे.

दत्ता पाटील यांनी समाजासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत डॉ. देवसरकर यांनी स्वतः पुढाकार घेत आवश्यक सर्व वैद्यकीय उपचार आणि सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला.

यावेळी डॉ. देवसरकर म्हणाले,

"समाजासाठी झटणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी



उभे राहणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. दत्ता पाटील यांच्या उपचारासाठी कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही."*जनतेच्या हक्कासाठी सातत्याने संघर्ष करणारे दत्ता पाटील हे आज शारीरिक व आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. हडसणी सारख्या छोट्याशा गावातून थेट राज्य सरकारला हादरवून सोडणाऱ्या या योद्ध्याच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची गरज व्यक्त होत आहे.मराठा समाजातील दानशूर नेतेमंडळींनी पुढाकार घेत दत्ता पाटील यांना आर्थिक मदतीचे पाठबळ द्यावे, अशी भावना समाजबांधवांतून व्यक्त होत आहे.

# श्रीवर्धनच्या विहान विचारेची राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड; राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदकाची चमकदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : उत्तराखंड राज्यातील देहरादून येथे जून महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय कराटे अजिंक्यपद स्पर्धेसाठी श्रीवर्धनच्या कु. विहान दर्शन विचारे याची निवड झाली असून, त्याने राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

दि. ९ व १० मे २०२६ रोजी नाशिक येथील जिल्हा क्रीडा संकुलात महाराष्ट्र राज्य सब-ज्युनियर, कॅडेट व ज्युनियर कराटे अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत श्रीवर्धनच्या चॅम्पियन्स कराटे क्लबच्या कु. विहान दर्शन विचारे याने +४५ किलो वजनी गटात दमदार खेळ करत सुवर्णपदक मिळवून अव्वल स्थान पटकावले. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याची जून महिन्यात देहरादून येथे होणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विहानने यापूर्वीही राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली असून, त्याने दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेतही सहभाग घेत आपल्या कौशल्याची छाप पाडली होती.

यंदा पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर श्रीवर्धनचे प्रतिनिधित्व करण्याची संधी त्याला मिळाली आहे.

या स्पर्धेत चॅम्पियन्स कराटे




क्लबच्या इतर विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. कु. मीरा सुहास साखरे हिने -३० किलो वजनी गटात रौप्यपदक मिळवले, तर कु. श्रेयस प्रकाश कोठावळे आणि कु. आराध्या रितेश मुरकर यांनी कांस्यपदक पटकावत क्लबचा गौरव वाढवला.

संपूर्ण महाराष्ट्रातून जवळपास २००० मुला-मुलींनी सहभाग घेतलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत श्रीवर्धनच्या विद्यार्थ्यांनी केलेली दैदिप्यमान कामगिरी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. या यशामागे संस्थेचे संस्थापक शिहान संतोष मोहिते यांचे मोलाचे मार्गदर्शन तसेच सेन्सेई अविनाश मोरे, प्रसाद विचारे, रितेश मुरकर आणि अनिकेत साखरे यांचे परिश्रम आणि योग्य प्रशिक्षण लाभले आहे.

विहानच्या या उज्ज्वल यशाबद्दल सर्व स्तरांतून त्याचे कौतुक होत असून, आगामी राष्ट्रीय स्पर्धेतही तो सुवर्ण कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

श्रीवर्धन तालुक्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.

# 9 जून ला सन्मान द्या व सन्मान घ्या पत्रकार संजीव भांबोरे यांच्या सामाजिक उपक्रमांतर्गत विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा होणार सत्कार

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** : सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, पत्रकार, कवी, लेखक , कृषी क्षेत्रातील अधिकारी, साहित्यिक, प्रबोधनकार,




डॉक्टर, वकील, दिव्यांग, शैक्षणिक क्षेत्रातील अधिकारी, यांचा समाजासाठी योगदान आहे असे कार्यकर्ते, अशा कार्यकर्त्यांचा माजी खासदार बौधसिंग भगत, माजी खासदार व अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.खुशाल बोपचे, अभिनेत्री चैताली भस्मे, अभिनेते अश्विनकुमार बघाले यांच्या प्रमुख उपस्थितीत अत्यंत दिमागदार सत्कार सोहळा 9 जून 2026 ला रोज मंगळवार ला सकाळी 11 वाजता सम्यक बुद्ध विहाराच्या पटांगणात आंबेडकर वार्ड पहेला येथे वेळेवर पार पडणार आहे. करिता सत्कार मूर्ती यांनी वेळेवर उपस्थित राहावे .सदर कार्यक्रमात जवळपास 50 सत्कारमूर्ती यांचा सत्कार करण्यात येणार आहे. असे कार्यक्रमाचे आयोजक प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांनी का पत्रकाद्वारे कळविले आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# केवळ विकास किंवा भाषणाने नाही तर व्यक्तिगत व्यवहारामुळे नेतृत्व घडते: देवेंद्र फडणवीस

## भाजपच्या दोन दिवसीय महानगर निवासी प्रशिक्षण वर्गाचा उत्साहात समारोप; विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : "केवळ विकासकामे किंवा उत्तम भाषणे करून नेतृत्व सिद्ध होत नाही, तर सामान्य जनता आणि कार्यकर्त्यांशी असलेल्या तुमच्या व्यक्तिगत व्यवहारामुळे आणि नात्यांमुळे खरे नेतृत्व घडते," असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर महानगर तर्फे आयोजित प्रशिक्षण वर्गामध्ये व्यवहारिक सत्र घेताना केले. भारतीय जनता पार्टी, नागपूर महानगरच्या वतीने आयोजित 'पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान - २०२६' अंतर्गत दोन दिवसीय निवासी महानगर प्रशिक्षण वर्गाच्या समारोपीय सत्रात ते बोलत होते. वर्धा रोड येथील ॲम्ब्रोशिया फार्म येथे आयोजित या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन ९ मे रोजी भाजप महानगर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व भारतमाता पूजनाने या वर्गाची सुरुवात झाली. यावेळी मंचावर प्रदेश उपाध्यक्ष उपेंद्र कोठेकर, आमदार परिणय फुके, खासदार मायाताई ईवनाते, संजय भेंडे, माजी आमदार गिरीश व्यास, माजी आमदार अनिल सोले, माजी आमदार डॉ मिलिंद माने,अभियानाचे विदर्भ संयोजक धर्मपाल मेश्राम, उपमहापौर लीला ताई हातीबेड, सत्तापक्ष नेता बाल्या बोरकर,श्रीकांत देशपांडे, अशोक मेंढे आदी मान्यवर उपस्थित होते.या निवासी वर्गामध्ये विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रथम सत्रात डॉ. उपेंद्र कोठेकर यांनी 'कार्य पद्धती' विषयावर मार्गदर्शन केले व या सत्राचे अध्यक्ष स्थान श्री परिणय फुके यांनी भूषविले. दुसऱ्या सत्रात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'केंद्र व राज्य सरकारची गरीब कल्याणकारी योजना' या विषयावर मार्गदर्शन केले व या सत्राचे अध्यक्ष स्थान खासदार मायाताई ईवनाते यांनी भूषविले. तिसऱ्या सत्रात श्री संजय फांजे यांनी 'बूथ व्यवस्थापन, मन की बात आणि सोशल मीडिया' या विषयावर मार्गदर्शन केले व या सत्राचे अध्यक्ष स्थान अर्चना ताई डेहनकर यांनी भूषविले. चौथ्या सत्रात डॉ. राजीव पोतदार यांनी 'कार्यकर्ता विकास' विषयावर मार्गदर्शन केले व या




सत्राचे अध्यक्ष स्थान डॉ. मिलिंद माने यांनी भूषविले. पाचव्या सत्रात प्रा. अनिल बोंडे यांनी 'देशासमोरील आव्हाने' विषयावर मार्गदर्शन केले व या सत्राचे अध्यक्ष स्थान प्रा. संजय भेंडे यांनी भूषविले. सहाव्या सत्रात श्री गिरीश व्यास यांनी 'कार्य विस्तार: आमची दृष्टी' या विषयावर मार्गदर्शन केले व या सत्राचे अध्यक्ष स्थान श्रीकांत देशपांडे यांनी भूषविले. सातव्या सत्रात श्री किरण पातुरकर यांनी 'विचार परिवार' या विषयावर मार्गदर्शन केले व या सत्राचे अध्यक्ष स्थान श्री अशोक मेंढे यांनी भूषविले. आठव्या सत्रात प्रा. अनिल सोले यांनी 'आपला इतिहास व विकास' या विषयावर मार्गदर्शन केले व या सत्राचे अध्यक्ष स्थान श्री धर्मपाल मेश्राम यांनी भूषविले. नवव्या सत्रात श्री दयाशंकर तिवारी यांनी 'वैचारिक अधिष्ठान' या विषयावर मार्गदर्शन केले व या सत्राचे अध्यक्ष स्थान श्री गिरीश देशमुख यांनी भूषविले. दहाव्या सत्रात श्री कौस्तुभ फलटनकर यांनी 'सोशल मीडिया, एआय (AI), नमो आणि सरल ॲप' या विषयावर मार्गदर्शन केले व या सत्राचे अध्यक्ष स्थान श्री समीर बाकरे यांनी भूषविले. अकराव्या व व्यावहारिक सत्रात राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले व या सत्राचे अध्यक्ष स्थान श्री दयाशंकर तिवारी यांनी भूषविले.यावेळी नवनिर्वाचित विधानपरिषद आमदार संजय भेंडे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले तर नवनिर्वाचित प्रदेशाचे उपाध्यक्ष उपेंद्र कोठेकर यांचे सुद्धा सत्कार शहराचे अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या हस्ते करण्यात आले.या दोन दिवसीय अभ्यास वर्गात संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी सुद्धा करण्यात आली होती सोबतच योगासनाने सकाळची सुरुवात करण्यात आली.या दोन दिवसीय निवासी वर्गासाठी नागपूर महानगरातील सुमारे १५० महानगरातील प्रमुख पदाधिकारी अपेक्षित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी संचालन प्रशिक्षण वर्ग प्रमुख संदीप जाधव यांनी केले. सोबत महामंत्री श्रीकांत आगलावे,रितेश गावंडे, संपर्क महामंत्री विष्णू चांगदे यांनी सहकार्य केले.वर्गाची व्यवस्था म्हणून कार्यालय मंत्री ब्रिजभूषण शुक्ला यांच्या मार्गदर्शनात विविध समित्यांनी जबाबदारी सांभाळली. यात वर्ग व्यवस्था म्हणून प्रा प्रमोदजी पेंडके,भोजराजजी डुंबे व प्रा गिरीश देशमुख यांनी सांभाळली,यामध्ये मंचव्यवस्था अश्विनी जिचकार यांनी बघितली, तर महिला निवास व्यवस्थेची जबाबदारी दिव्याताई धुरडे व मनीषा अतकरे यांनी यशस्वीपणे पार पाडली. नोंदणी व्यवस्था सुमित मिश्रा व शिशिर त्रिपाठी यांनी सांभाळली, तर भोजन व्यवस्थेचे नियोजन सचिन करारे, रितेश पांडे, रिषभ अरखेल व अथर्व त्रिवेदी यांनी केले.सोबत सुधीर हिरडे,भूषण गावंडे व विनायक पंढरीपांडे यांनी सहकार्य केले.कार्यकर्त्यांना पक्षाची विचारधारा आणि सरकारच्या योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे कौशल्य प्राप्त व्हावे, हा या वर्गाचा मुख्य उद्देश असल्याचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी आभार प्रदर्शनात सांगितले. या प्रशिक्षणातून कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून आगामी काळात संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याची रणनीती यावेळी आखण्यात आली.

## शेतकऱ्यांच्या घराला आग लागून लाखो रुपयाचा नुकसान

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी: अनिल ससाने** : जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील पापळ येथे शेतकऱ्यांच्या घरांना आग लागून लाखो रुपयाचा नुकसान झाले आहे सोमवारी दुपारच्या तीन वाजेच्या सुमारास अचानक गावामध्ये आसाराम इंगळे व ज्ञानेश्वर इंगळे या शेतकऱ्यांच्या घरांच्या मांगाच्या बाजूस आग लागली असता असे गावकऱ्यांना समजता गावकऱ्यांनी त्या ठिकाणी धाव घेऊन आग आटोक्यात आणली गावातील काही शेतकऱ्यांनी



अग्निशामक दल यांना आग लागताच कळवले असता तरी सुद्धा अग्निशामक दलाची गाडी आग विझवण्यासाठी वेळेवर पोहोचली नाही गाडी वेळेवर पोहोचले असते तर शेतकऱ्यांचे एवढे नुकसान झाले नसते गावकऱ्यांनी अग्निशामक दल घटनास्थळी उशिरा पोहोचल्याबद्दल पूर्णपणे नाराजी व्यक्त केली आहे तरीसुद्धा शासन अग्निशामक दलाची गाडी का उशिरा पोहोचली त्याबद्दलची चौकशी करेल का? असा प्रश्न निर्माण झाला आहे या आगेमध्ये शेतकऱ्यांचे संसारिक वस्तू व मौल्यवान वस्तू धान्य जळून खाक झाले आहे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे या घटनेचा सदरील पंचनामा तलाठी मंडळ अधिकारी यांनी तातडीने केला आहे या शेतकऱ्यांना आर्थिक मदत तातडीने केली पाहिजे अशी इच्छा गावकरी व शेतकरी करीत आहे

## सराटेवडगावच्या लेकीचा राज्यात डंका दहावी बोर्ड परीक्षेत शंभर पैकी शंभर गुण घेत अक्षता नन्नवरेने आष्टी तालुक्याची मान उंचावली

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव गावासाठी अभिमानाची आणि आनंदाची बातमी समोर आली असून माजी चेअरमन राजाराम नन्नवरे यांची नात तर अनिल नन्नवरे यांची कन्या कु.अक्षता

नन्नवरे हिने दहावी बोर्डाच्या परीक्षेत शंभर पैकी शंभर गुण मिळवत ऐतिहासिक यश संपादन केले आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे संपूर्ण आष्टी तालुक्यातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अत्यंत शांत,अभ्यासू आणि मेहनती स्वभावाची असलेल्या अक्षताने वर्षभर सातत्याने अभ्यास करत



हे यश मिळवले. ग्रामीण भागातून शिक्षण घेत असतानाही तिने आपल्या जिद्द, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाच्या बळावर राज्यभरात आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे.दहावीच्या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेत शंभर टक्के गुण मिळवणे ही मोठी आणि दुर्मिळ कामगिरी मानली जात असून अक्षताने हे यश संपादन करून सराटेवडगावाचे नाव राज्यभर पोहोचवले आहे.

अक्षताच्या यशामागे तिचे आई-वडील,

आज्जी,आजोबा, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबाचा पाठिंबा महत्त्वाचा ठरल्याचे बोलले जात आहे.तिच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नातेवाईक, मित्रपरिवार तसेच सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तिचे अभिनंदन करत आहेत.

अक्षताने घेतलेली मेहनत आणि तिचा अभ्यासातील सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळेच हे यश मिळाले.मुलीने शंभर टक्के गुण मिळवून आमच्या कुटुंबासह संपूर्ण गावाचा सन्मान वाढवला आहे. तिचा आम्हाला अभिमान आहे अशी प्रतिक्रिया वडील अनिल


नन्नवरे यांनी झुंजारनेताशी बोलताना दिली.

ग्रामीण भागातुन आलेल्या विद्यार्थ्यांसाठी अक्षताचे यश प्रेरणादायी आहे. मेहनत,जिद्द आणि योग्य नियोजन असेल तर मोठे यश मिळवता येते, हे तिने सिद्ध करून दाखवले आहे असे संस्थाध्यक्ष मनोज धस यांनी सांगीतले.

## "आमदार बाबासाहेब देशमुख यांना पितृशोक हजारोंच्या उपस्थितीत अंत्ययात्रा"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर** : ज्यांनी सहा दशकं सांगोला विधानसभेच्या माध्यमातून लोकशाहीच्या दरबारात लोकप्रतिनिधी म्हणून नाव लौकिक मिळविला आणि आपल्या कार्याचा ठसा राज्यभर पसरविला असे महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री स्वर्गीय गणपतराव देशमुख यांचे सुपुत्र सध्याच्या सांगोला विधानसभेच्या माध्यमातून लोकप्रतिनिधीत्व सांभाळत असलेल्या आदरणीय आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांचे वडील आण्णासाहेब उर्फ पोपटराव देशमुख यांचे वयाच्या 65 व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या दुःखद निधनाची बातमी समजताच सांगोला तालुका, पेनुर ता. मोहोळ त्याचबरोबर सोलापूर जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील त्यांचे स्नेही, आप्तेष्ट ,नातेवाईक, मित्रमंडळी, सगे सोयरे, व लोकप्रतिनिधी, राजकीय सामाजिक शैक्षणिक कृषी संस्कृती त्याचप्रमाणे सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या अंत्यदर्शनासाठी पेनुर येथील निवासस्थानी बहुगर्दी केली. पोपटराव उर्फ अण्णासाहेब देशमुख हे शेती प्रिय त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रावर प्रेम करणारी व्यक्ती म्हणून प्रसिद्ध होती. त्यांचा मनमिळावू स्वभाव वाखाणण्याजोगा होता. त्यांच्या जाण्याने सर्व क्षेत्रात



मोठी पोकळी निर्माण झाली आहे असे अनेकांच्या चर्चेतून सूर निघत होता. हजारोंच्या समुदायाने अंत्ययात्रेमध्ये सहभाग नोंदवला होता.तर तुमच्या जीवनातील अनेक पैलू अंत्ययात्रेच्या वेळी श्रद्धांजलीपर भाषणातून अनेकांनी व्यक्त केले. त्यांच्या जाण्याने मोठी शोककळा पसरल्याचे दिसून आले. त्यांच्या पश्चात आई पत्नी , विवाहित मुलगा, भाऊ, भावजय, पुतणे, सुना, जावई, नातवंडे, बहिणी असा मोठा परिवार आहे.

## वाइन शॉप फोडून पावणे तीन लाखांची विदेशी दारू व रोकड लंपास

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : चोरट्यांनी पनवेल शहरातील 'सिटी वाइन शॉप'चे शटर उचकटून सुमारे २ लाख ७६ हजार रुपये किमतीची महागडी विदेशी दारू आणि रोख रक्कम चोरून नेल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी वाइन शॉपचे मालक रमेश नारायण उतेकर (४८) यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.पनवेल येथील ठाणा नाका परिसरात असलेल्या ओम साई बिल्डिंगमध्ये सिटी वाइन शॉप हे दुकान आहे. हे दुकान नेहमीप्रमाणे बंद करण्यात आले होते. चोरट्यांनी पहाटेच्या सुमारास दुकानाच्या शटरचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला आणि दुकानातील महागड्या ब्रँड्सच्या बाटल्यांवर डल्ला मारला. सकाळी कामगार दुकान उघडण्यासाठी आले असता, त्यांना वाईन शॉपमध्ये चोरी झाल्याचे लक्षात आले. चोरट्यांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने महागड्या दारूच्या बाटल्यांची निवड केल्याचे दिसून येत आहे. आपली ओळख पटू नये म्हणून चोरट्यांनी दुकानातील सीसीटीव्ही फुटेजचा डीव्हीआर संच देखील चोरून आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# धारणगावच्या भोंदू बाबा महेशगिरीला न्यायालयाचा दणका; जामीन अर्ज फेटाळला

## अंधश्रद्धेच्या आड महिलांची दिशाभूल; लैंगिक शोषण व फसवणुकीच्या गंभीर आरोपांमुळे न्यायालयाचा कठोर निर्णय

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यातील धारणगाव खडक येथे स्वतःला महाराज म्हणवत दैवी शक्तीच्या नावाखाली महिलांची फसवणूक व लैंगिक शोषण केल्याचा आरोप असलेल्या भोंदू बाबा महेशगिरी ऊर्फ महेश दिलीप काकडे (वय ३१) याला जिल्हा व सत्र न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. सोमवार दि. ११ मे रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळून लावत आरोपीचा मध्यवर्ती कारागृहातील मुक्काम वाढवला.

प्रभारी जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. के. आर. जोगळेकर यांनी गुन्ह्याचे गंभीर स्वरूप, तपासावर होणारा संभाव्य परिणाम तसेच पुढे आणखी तक्रारदार समोर येण्याची शक्यता लक्षात घेत आरोपीस जामीन देण्यास नकार दिला.

या प्रकरणातील २८ वर्षीय विवाहित पीडित महिला कौटुंबिक तणाव आणि मानसिक अस्वस्थतेतून जात असताना तिच्या पालकांनी तिला धारणगाव खडक येथील तथाकथित 'प्रतिगाणगापूर' मठात नेले होते. तेथे महेशगिरी हा स्वतःमध्ये दैवी शक्ती असल्याचा दावा करत महिलांवरील भुताटकी, करणीबाधा व धार्मिक विधीच्या नावाखाली लोकांची दिशाभूल करत असल्याचे तपासात समोर आले आहे.

पीडित महिलेला 'करणीबाधा' असल्याचे सांगून आरोपीने विविध धार्मिक विधी करण्यास भाग पाडले. त्यानंतर तिचा मोबाईल क्रमांक घेऊन "तू मला आवडतेस", "लग्न



करू नकोस, माझा मठ चालव" अशा प्रकारचे वैयक्तिक व अश्लील संदेश पाठवण्यास सुरुवात केल्याचा आरोप आहे.

दि. २३ ऑगस्ट २०२४ रोजी आरोपीने महिलेला नाशिक येथे बोलावून त्र्यंबकेश्वर रोडवरील एका लॉजवर नेले. "माझ्याकडे दैवी शक्ती आहे, तू विरोध करू शकणार नाहीस," अशी भीती दाखवत तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच विवस्त्र छायाचित्रे काढून ती व्हायरल करण्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे.

आरोपीच्या भीतीमुळे पीडित महिला बराच काळ तक्रार देण्यास धजावत नव्हती. मात्र, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी तिला धीर दिल्यानंतर अखेर तिने लासलगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

त्यानंतर पोलिसांनी बलात्कारासह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती एस. एस. सुक्रे यांच्या न्यायालयाने आरोपीला पोलीस कोठडी सुनावली होती. सहा दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर त्याची रवानगी जिल्हा मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली.

दरम्यान, आरोपीच्या वतीने ॲड. प्रभाकर रणशूर यांनी भारतीय न्याय संहिता कलम ४८३ अंतर्गत जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता रामनाथ शिंदे यांनी जामिनास तीव्र विरोध दर्शवत हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तपास अधिकारी तथा लासलगावचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनीही तपासातील महत्त्वाचे मुद्दे न्यायालयासमोर मांडले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला जामीन दिल्यास तपासावर परिणाम होऊ शकतो तसेच या प्रकरणात आणखी महिलांची फसवणूक अथवा शोषण झाल्याच्या तक्रारी पुढे येण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे निरीक्षण नोंदवत जामीन अर्ज फेटाळून लावला.

# आगामी जनगणनेसाठी नांदगाव प्रशासन सज्ज

## चार टप्प्यांत विशेष प्रशिक्षण पूर्ण; डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरावर भर

**दैनिक युवक आधार नाशिक**

**जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** देशाच्या विकासाचा पाया मानल्या जाणाऱ्या आगामी जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर नांदगाव तालुका प्रशासनाच्या वतीने प्रगणक, पर्यवेक्षक तसेच राखीव कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेले चार टप्प्यांचे विशेष प्रशिक्षण उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले. पंचायत समिती सभागृह तसेच गव्हर्नमेंट आयटीआय कॉलेज, नांदगाव येथे हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह जनगणना करण्यावर प्रशासनाने विशेष भर दिला.

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षणाचा पहिला टप्पा 23 ते 25 एप्रिल, दुसरा टप्पा 27 ते 29 एप्रिल, तिसरा टप्पा 2 ते 4 मे आणि चौथा टप्पा 6 ते 8 मे दरम्यान पार पडला. चारही टप्प्यांना अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रत्येक प्रशिक्षण वर्गात सुमारे 50 कर्मचाऱ्यांचा सहभाग नोंदविण्यात आला. एकूण 312 एचएलबी, 312 प्रगणक, 51 पर्यवेक्षक, 31 राखीव प्रगणक आणि 6 राखीव पर्यवेक्षकांनी प्रशिक्षण घेतले. उपस्थित कर्मचाऱ्यांनी जनगणना प्रक्रियेतील विविध तांत्रिक बाबी आत्मसात करत जबाबदारीपूर्वक सहभाग नोंदविला.

या संपूर्ण प्रशिक्षणाचे आयोजन चार्ज अधिकारी तथा तहसीलदार सुनील सौंदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. निवासी नायब तहसीलदार देवेंद्र कुऱ्हे यांच्या नियंत्रणाखाली प्रशिक्षण प्रक्रिया यशस्वीपणे राबविण्यात आली. जिल्हा



**प्रगणक व पर्यवेक्षकांना मार्गदर्शन करताना जिल्हा जनगणना अधिकारी विशाल दिवेकर.**

जनगणना अधिकारी विशाल दिवेकर यांनी प्रशिक्षणास भेट देत जनगणनेचे महत्त्व अधोरेखित केले व उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून विशाखा गोसावी, तुषार येवले, दत्तात्रय टिळे, सुनील आसने आणि अभिताभ अभ्यंकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तज्ज्ञ मार्गदर्शक विशाखा गोसावी यांनी जनगणना प्रक्रिया सुरुवातीपासून शेवटपर्यंत टप्प्याटप्प्याने समजावून सांगितली. डिजिटल साधनांचा वापर, मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलन, डेटा एन्ट्रीतील अचूकता, माहितीची गोपनीयता राखण्याचे नियम तसेच नागरिकांशी संवाद साधताना घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी सखोल माहिती दिली.

प्रशिक्षण अधिक प्रभावी होण्यासाठी प्रत्यक्ष क्षेत्रात उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. नागरिकांकडून माहिती घेताना येणाऱ्या अडचणी, तांत्रिक अडथळे, मोबाईल ॲप वापरताना घ्यावयाची दक्षता तसेच माहिती पडताळणी यावरही मार्गदर्शकांनी विशेष सूचना दिल्या. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष सरावाची संधी उपलब्ध करून देत विविध काल्पनिक परिस्थितींमध्ये कार्यपद्धतीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. त्यामुळे प्रशिक्षणार्थींमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून आगामी जनगणनेसाठी प्रशासन सज्ज असल्याचे चित्र दिसून आले.

जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजणी नसून देशाच्या विकास आराखड्याचा महत्त्वपूर्ण पाया मानली जाते. शासनाच्या विविध योजना, निधी वाटप, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकासाच्या धोरणांसाठी जनगणनेतील माहिती अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याने प्रशासनाने या प्रशिक्षणाकडे गांभीर्याने लक्ष दिले आहे.

**“जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. अचूक माहितीच्या आधारे शासन विविध योजना प्रभावीपणे राबवू शकते. नांदगाव तालुक्यात सक्षम आणि प्रशिक्षित मनुष्यबळ तयार झाले असून डिजिटल तंत्रज्ञानामुळे यंदाची जनगणना अधिक पारदर्शक आणि अचूक होईल, असा विश्वास आहे.”**

**विशाल दिवेकर, जिल्हा जनगणना अधिकारी :**

**“या प्रशिक्षणामुळे जनगणना प्रक्रियेबद्दल सविस्तर माहिती मिळाली. मोबाईल ॲपचा वापर, माहिती संकलनाची पद्धत आणि प्रत्यक्ष सरावामुळे काम अधिक सोपे व आत्मविश्वासपूर्ण वाटत आहे. तज्ज्ञांनी दिलेले मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरले.”**

**संदीप पाटील, प्रगणक :**

**“प्रशिक्षणामध्ये प्रत्येक प्रगणक आणि पर्यवेक्षकाला जबाबदारीची जाणीव करून देण्यात आली आहे. नागरिकांकडून अचूक माहिती संकलित करताना संवेदनशीलता, गोपनीयता आणि शिस्त याला प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आगामी जनगणनेसाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे.”**

**सुनील सौंदाणे, चार्ज अधिकारी तथा तहसीलदार :**

# एकाच कुटुंबांमध्ये दोन सदनिका मीळवुन म्हाडाची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**संतोष शेवाळे -खालापुर** : म्हाडाच्या सदनिका मधे एकाच कुटुंबात दोन वेगवेगळ्या नावाने सदनिका मिळाल्या ह्याची चौकशी लावून हा प्रकरण उघडकीस आणला आहे. शिरढोण म्हाडा वसाहत येथे श्री विशाल बाळासाहेब हिंडणे या व्यक्तीने बि.नं.१/अ रुम नं.२०६ व त्यांचि पत्नी सौ.कांचन विश्वास पडवळ बि.नं.१/बी रुम नं.३०३ या ठिकाणी हे दोघेही पती पत्नी असुन यांनी पत्नीच्या जुन्या नावाने सदनिका घेऊन PMAY योजनेचा दुबार लाभ घेऊन केंद्र शासनाची फसवणूक केली आहे.परंतु ही सदनिका घेण्या अगोदर पासुन हे दोघेही विवाहित आणि यांना दोन अपत्ये आहेत.तरी सुद्धा यांनी स्वतः बद्दलची माहिती लपवून ठेऊन दोन सदनिका पत्नीच्या जुन्या नावाने सोडती




मधे प्राधान्य मीळवलेले आहे. नियमा नुसार विवाह झाल्यानंतर पत्नीने पतीचे नाव लावणे बंधनकारक आहे.परंतु यांनी केंद्र शासन व राज्य सरकार व म्हाडा ची फसवणूक करण्यासाठी यांनी नावा मधे बदल केलेला नाही.एका कुटुंबातील एका व्यक्तीला मीळणारा PMAY योजनेचा लाभ दोन व्यक्तींना कशा काय देण्यात आला. म्हाडाने प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्यामुळे सदनिकाधारांना १०% अनुदानाची रक्कम १,४३,०९०/- प्रत्येकाला वितरीत करण्यात आली तसेच PMAY योजनेची रक्कम रु.२,५०,०००/- लाभ मीळाला. सदर व्यक्ती आणि या कुटुंबावर योग्य ती कारवाई करण्यात यावी.जेणेकरुन या योजनेचा फायदा समाजातील खरोखर गरजु असणार व्यक्ती पर्यंत पोहचेल आणि समाजामध्ये चांगले विचार पोहोचतील.श्री विशाल बाळासाहेब हिंगणे व त्यांची पत्नी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी व सदर अनुदान व PMAY योजनेचा लाभ घेतल्याबद्दल या सर्व रक्कमेवर १८% व्याजदर लावुन संपूर्ण रक्कम केंद्र सरकारने व राज्य सरकारने परत घ्यावी व यांच्यावर खोटे कागदपत्र, शासनाची फसवणूक केल्याबद्दल यांची सखोल चौकशी व समीती गठित करुन यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा.

# बिल्डरने मंजूर नकाशापेक्षा जास्त फ्लॅट बांधून केली ग्राहकांची फसवणूक; 'नागरी विकास ग्राहक मंच' धडकले मनपा आयुक्तांकडे

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : शहरात इमारतीचे बांधकाम करताना मंजूर नकाशाचे उल्लंघन करून अतिरिक्त फ्लॅटचे अनधिकृत बांधकाम करणे आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे त्यांची विक्री करून ग्राहकांची फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. असाच एक गंभीर प्रकार धंतोली परिसरात उघडकीस आला असून, या विरोधात नागरी विकास ग्राहक मंच आक्रमक झाला आहे. याप्रकरणी संघटनेच्या वतीने नागपूर महानगरपालिकेच्या धरमपेठ झोनचे सह आयुक्त श्री. मेश्राम यांना सविस्तर निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी करण्यात आली.

***निवेदनातील मुख्य विषय:**

"मंजूर नकाशाप्रमाणे ७ फ्लॅट असताना ८ फ्लॅटचे अनधिकृत बांधकाम करणे, खोटी डीड ऑफ डिक्लेरेशन (DOD) सादर करणे आणि नझुल चौकशीत अवैध



ठरलेल्या बांधकामावर मनपाने निष्कासनाची कारवाई करण्याबाबत."

*नेमके प्रकरण काय?*

संबंधित इमारतीसाठी महानगरपालिकेने केवळ ७ फ्लॅटची मंजुरी दिली होती. मात्र, बिल्डरने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी नियमांची पायमल्ली करत ८ फ्लॅट बांधले. विशेष म्हणजे, चौथ्या मजल्यावर केवळ एकच फ्लॅट मंजूर असताना तिथे दोन स्वतंत्र फ्लॅट तयार करून त्यांची विक्री करण्यात आली. या बेकायदेशीर कृत्यासाठी बनावट प्रतिज्ञापत्रे आणि खोट्या दस्ताऐवजांचा वापर करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

**प्रशासकीय दिरंगाईवर ताशेरे:**

महसूल व नझुल विभागाने प्रत्यक्ष स्थळपाहणी करून हे वाढीव बांधकाम 'अवैध' असल्याचा अहवाल दिला आहे. तसेच या फसवणुकीप्रकरणी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा (FIR) देखील दाखल आहे. असे असतानाही महानगरपालिका प्रशासनाकडून अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत टाळाटाळ होत असल्याने ग्राहक मंचने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

याप्रसंगी उपस्थित पदाधिकारी:

निवेदन देताना *नागरी विकास ग्राहक मंचचे* खालील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते:

श्री. मिलिंद खेकाळे (महाराष्ट्र कार्याध्यक्ष)

श्री. उत्तमजी सालवणकर (नागपूर कार्याध्यक्ष)

श्री. अरविंदजी तायडे (संघटक)

श्री. विजय नोमुलवार (उपाध्यक्ष)

सामान्य नागरिकांच्या हक्कासाठी आणि अनधिकृत बांधकामांच्या विरोधात हा लढा अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी ग्राहक मंचतर्फे देण्यात आला आहे.

# सिंधी समाजाचे सर्वच क्षेत्रात अत्यंत मोलाचे योगदान - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## सिंधी समाज बांधवांना मालकी पट्ट्यांचे वाटप, समाजातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : निर्वासित म्हणून भारतात दाखल झालेल्या सिंधी समाजाने शून्यापासून सुरुवात केली. आज देशाच्या व्यापार क्षेत्रासह सर्वच क्षेत्रामध्ये हा समाज आघाडीवर असून देशाच्या विकासात मोलाचे योगदान देत आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे काढले.

विदर्भ सिंधी विकास परिषदेच्या वतीने जरीपटका येथील महात्मा गांधी हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. या कार्यक्रमात सिंधी बांधवांना मालकी पट्ट्यांचे वितरण करण्यात आले. तसेच समाजातील नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर भगवानदास सवनानी, आमदार कुमार आयलानी, अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, भारतीय सिंधू सभेचे राष्ट्रीय संरक्षक घनश्याम कुकरेजा, सिंधी विकास परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनकी रूघवानी,



संयोजक वीरेंद्र कुकरेजा, सचिव पि.टी. दारा आदी उपस्थित होते. यावेळी ३६ नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यापैकी १२ नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात करण्यात आला.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, देशाच्या फाळणीनंतर या समाजाला घर, शेती, व्यापार सोडून विस्थापित होऊन भारतात यावे लागले. त्याचप्रमाणे अनेक वर्ष या समाज बांधवांना निर्वासितांच्या शिबिरामध्ये घालवावी लागली. समाजाने आपले दुःख हे संघर्षाचे शस्त्र बनवले. आज हा समाज सर्व क्षेत्रात आघाडीवर असून देशाच्या विकासात अत्यंत मोलाचे योगदान देत आहे, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सिंधी बांधवांना नागरिकत्व प्रदान करण्याचे देशभरात अभियान राबवले गेले. सिंधी बांधव वास्तव्यास असलेल्या जमिनी अतिक्रमण ठरत होत्या. त्यामुळे सिंधी बांधवांना मालकी पट्टे मिळावे , अशी मागणी सुरू होती. संधी मिळताच आम्ही या प्रश्नावर तोडगा काढला आणि सिंधी बांधवांना वर्ग एकच्या शंभर टक्के मालकी हक्काचे पट्टे देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सिंधी बांधवांना मालकी हक्काचे पट्टे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

आगामी काळातही अत्यंत वेगाने या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल. तसेच उल्हासनगर येथील सिंधी बांधवांसाठी वेगळ्या पद्धतीने नियमितीकरण करण्याचा निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना दिली.

विनकी रुघवाणी यांनी प्रास्तविक केले. विकी कुकरेजा यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

**३५० सिंधी बांधवांना पट्टे वाटप**

भारताच्या फाळणीनंतर पश्चिम पाकिस्तानातून आलेल्या सिंधी विस्थापितांचे नागपूर जिल्ह्यातील खामला, मेकोसाबाग व जरीपटका या भागात पुनर्वसन करण्यात आले.या तीन वसाहतींना अधिकृत विस्थापित वसाहतीचा दर्जा देण्यात आला. अनेक विस्थापित कुटुंबे मागील 70 ते 75 वर्षांपासून या ठिकाणी वास्तव्यास असून त्यांनी नागपूर शहराच्या आर्थिक, सामाजिक व व्यापारी विकासात मोठे योगदान दिले. आज 350 सिंधी बांधवांना मालकी हक्काचे पट्टे वाटप करण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बारा जणांना प्रातिनिधिक स्वरूपात पट्टे वाटप करण्यात आले.

# ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाचे नवे केंद्र; लोणीतील ‘लिटिल फ्लॉवर स्कूल’ सुरू

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : शिक्षणानेच समाजाचा सर्वांगीण विकास होतो, हाच विचार समोर ठेवून लोणी येथे ‘लिटिल फ्लॉवर स्कूल’ या नवीन शैक्षणिक संकुलाचा भव्य उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. सोनू भाऊ पनसारी यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या या शाळेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षणाची नवी संधी उपलब्ध झाली आहे.

या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीने विशेष शोभा आली. प्रमुख पाहुणे म्हणून अँड. नकुल दादा देशमुख, अमृता ताई देशमुख, सचिन दादा ईप्पर यांच्यासह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते फित कापून आणि दीपप्रज्वलन करून शाळेचे अधिकृत लोकार्पण करण्यात आले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना वक्त्यांनी ग्रामीण भागातील दर्जेदार शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. आधुनिक शिक्षणासोबत विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणणे ही काळाची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. ‘लिटिल फ्लॉवर स्कूल’ ही संस्था विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी भक्कम पाया ठरेल, असा विश्वासही मान्यवरांनी व्यक्त केला.

या शैक्षणिक उपक्रमामागे सोनू भाऊ पनसारी यांची दूरदृष्टी आणि शिक्षणाविषयीची तळमळ दिसून येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणेच आधुनिक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, या उद्देशाने ही शाळा



सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे परिसरातील पालकांमध्ये विशेष समाधान व्यक्त होत आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा अत्यंत नेटकी आणि प्रभावी होती. युवामित्र साहिल जाधव यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली, तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि व्यवस्थापन सुमित जमधाडे यांनी उत्कृष्टरीत्या सांभाळले. त्यांच्या प्रयत्नांमुळे उद्घाटन सोहळा अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वी ठरला.

या सोहळ्यास मोठ्या संख्येने ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमी उपस्थित होते. शाळेच्या आधुनिक संकल्पनेचे आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या सुविधांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ‘लिटिल फ्लॉवर स्कूल’ ही संस्था शिक्षणाचे नवे केंद्र ठरणार असून, लोणी गावाच्या शैक्षणिक विकासाला नवी दिशा देणार आहे.

# तरुणाईचा देश आणि वृद्ध नेतृत्व

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : भारत हा जगातील सर्वांत मोठ्या तरुण लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जातो. “यंग इंडिया” ही केवळ प्रचारात्मक घोषणा नसून ती भारताची जागतिक ओळख बनलेली आहे. आज भारताचे सरासरी वय सुमारे २९ वर्षे आहे. जगातील अनेक विकसित देश वृद्ध लोकसंख्येच्या समस्येला सामोरे जात असताना भारताकडे मोठ्या प्रमाणात कार्यक्षम, ऊर्जावान आणि कौशल्यप्रवीण तरुण मनुष्यबळ उपलब्ध आहे. त्यामुळेच जागतिक उद्योग, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि विकसित राष्ट्रांचे आर्थिक लक्ष भारताकडे सातत्याने केंद्रित होताना दिसत आहे.

जगाच्या आर्थिक विकासाचा ओघ हळूहळू युरोपकडून आशियाकडे वळताना दिसतो आहे. चीननंतर भारत हा जगातील सर्वांत मोठा बाजारपेठीय आणि उत्पादनक्षम देश म्हणून उभा राहत आहे. पश्चिम आशियाई देश, युरोपीय राष्ट्रे आणि अमेरिकेसारखे विकसित देश भारतामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यासाठी स्पर्धा करत आहेत. यामागील सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे भारतातील प्रचंड बेरोजगार तरुणाई त्यामुळे तुलनेने कमी खर्चात उपलब्ध होणारा श्रमिक वर्ग. उत्पादन क्षेत्र, सेवा क्षेत्र, माहिती-तंत्रज्ञान, डिजिटल अर्थव्यवस्था आणि स्टार्टअप संस्कृती यामध्ये भारतीय तरुणाईने जागतिक पातळीवर स्वतःची क्षमता सिद्ध केली आहे.

परंतु या सकारात्मक चित्राच्या उलट एक विसंगती भारतीय राजकारणात प्रकर्षाने जाणवते. देश तरुणांचा असला तरी नेतृत्व मात्र मोठ्या प्रमाणावर वृद्ध पिढीकडे केंद्रीत असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. भारतातील प्रमुख राजकीय नेतृत्वाचे सरासरी वय आजही ६५ ते ७५ वर्षांच्या आसपास दिसते. अनेक पक्षांमध्ये निर्णयप्रक्रिया, संघटनात्मक नियंत्रण आणि नेतृत्वाची सूत्रे दीर्घकाळ एका विशिष्ट पिढीकडेच राहिलेली आहेत.

याउलट विकसित देशांमध्ये तुलनेने तरुण नेतृत्वाला अधिक संधी दिली जात असल्याचे स्पष्ट दिसते.फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी अवघ्या ३९ व्या वर्ष राष्ट्राध्यक्षपद स्वीकारले. न्यूझीलंडमध्ये जॅसिंडा आर्डर्न ३७ व्या वर्षी राष्ट्र प्रमुख बनल्या, तर फिनलंडमध्ये सन्ना मरिन यांनी ३४ व्या वर्षी देशाचे नेतृत्व केले. विकसीत देशात नेत्यांचे सरासरी आयुर्मान ४५ ते ५५ वर्षांदरम्यान दिसून येत आहे.

भारतातील राजकारणात हा बदल सर्वप्रथम ओळखण्याचा प्रयत्न भारतीय जनता पक्षाने केल्याचे दिसते. शीर्ष नेतृत्व सोडले तर राज्य, जिल्हा आणि संघटनात्मक पातळीवर भाजपने सातत्याने तरुण नेतृत्व पुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे.

२०१४ मध्ये तुलनेने तरुण चेहरा म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्री पदाची धुरा सोपविली. त्यामागे संघटनात्मक बांधणी रणनीती तर पुढच्या दोन राज्यांसाठी राजकीय दूरदृष्टी ठेवण्याचा दीर्घ विचार होता त्यासोबतच राजकीय घराणे आणि ब्राह्मण या दोन्ही बाजु त्यांच्या कडे होत्या.

त्याचप्रमाणे उत्तरप्रदेशमध्ये योगी आदित्यनाथ, मध्यप्रदेशमध्ये मोहन यादव, राजस्थानमध्ये भजनलाल शर्मा, हरियाणामध्ये नायब सिंग सैनी, आसाममध्ये हिमंता बिस्वा सरमा, महाराष्ट्रात चंद्रशेखर बावनकुळे, पंकजा मुंडे, नितेश राणे यांसारख्या तरुण चेहऱ्यांना संघटनात्मक आणि राजकीय जबाबदाऱ्या देण्यात आल्या.

भाजपने युवक मोर्चा, सोशल मीडिया नेटवर्क, बूथ व्यवस्थापन आणि डिजिटल प्रचार यामध्ये तरुणांचा प्रभावी वापर करून संघटनात्मक रचना अधिक मजबूत केली. त्यामुळे नव्या मतदारांशी थेट संवाद साधण्यात भाजपला यश मिळाले.

अर्थात या तरुणांनी कधीही संघ संचालक, मोदीजी, अमित शहा यांच्यावर हावी होण्याचा प्रयत्न सुद्धा केला नाही हे वास्तव मान्य करावेच लागते.

दुसरीकडे काँग्रेस पक्षाकडे पाहिले असता अनेकदा तरुण नेतृत्वाकडे दुर्लक्ष झाल्याची टीका होताना दिसते. मात्र असे असले तरी काँग्रेसने काही ठिकाणी तरुण नेतृत्वाला संधी दिल्याची उदाहरणेही दिसतात.

राजस्थानमध्ये सचिन पायलट यांना प्रदेशाध्यक्ष म्हणून निवडले. पंजाबमध्ये नवज्योत सिंग सिद्धू यांना सन्मानाची भूमिका देण्यात आली. तेलंगणा रेवंथ रेड्डी नेतृत्त्व सोपवले, छत्तीसगड मध्ये टी. एस. सिंग देव, कर्नाटकात डी. के. शिवकुमार, विश्वजीत कदम आणि सतेज पाटील यांनी जोडून प्रयत्न केला आहे.

तथापि, काँग्रेससमोरील मुख्य अडचण म्हणजे नेतृत्वावरील अंतिम नियंत्रण अजूनही पारंपरिक गटांकडे असल्याचे चित्र. मध्यप्रदेशमध्ये ज्योतीराजे सिंधिया यांच्यासारख्या तरुण आणि प्रभावी नेत्याला योग्य वेळी नेतृत्वाची संधी मिळाली असती तर मध्य प्रदेश राज्याचे राजकीय चित्र वेगळे दिसले असते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात वारंवार

होताना दिसते. राजस्थानमध्ये सचिन पायलट यांना पूर्ण नेतृत्व देण्यास काँग्रेसने दाखवलेला संकोच पक्षासाठी नुकसानकारक ठरल्याचे अनेकांचे मत आहे. पंजाबमध्ये अमरेंद्र सिंग आणि नवज्योत सिंग सिद्धू यांच्यातील संघर्ष हाताळताना काँग्रेसला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. या सगळयामुळे तरुण नेतृत्वामध्ये अस्वस्थता निर्माण झाल्याचे दिसून आले.

काँग्रेससमोर आणखी एक मोठे आव्हान म्हणजे संघटनात्मक पातळीवरील कमकुवतपणा. भाजपने गेल्या दोन दशकांमध्ये बूथ ते दिल्ली अशी साखळी मजबूत करताना वर्षभर कार्यकर्ते जुळवणे, घडवणे, आयात करणे यावर काम करते. तर काँग्रेस निवडणुका तोंडावर आल्यावर मर्यादित हालचाल करते, त्यातही तिकीट देताना योग्य/अयोग्य चा विचार न करता सतरंजी उचल्या, घरचे कप उचल्या अर्थात कानाखाली राहणाऱ्यांनाच प्राधान्य देते किंवा पहिला प्रश्न करते की, निवडणुकीत खर्च किती करू शकता?" अशी कुजबुज चालते. त्यात किती प्रमाणात तथ्य असते हे आतील लोकांनाच माहीत असते. हे सर्व मांडण्याचे कारण की,अनेक राज्यांमध्ये कार्यकर्त्यांची नवी पिढी तयार करण्यात काँग्रेस अपयशी ठरली आहे. पक्षात नवीन नेते घडवणे तर दूर असलेले नेते सुद्धा ते टिकवू शकले नाही. आजचे राजकारण केवळ मोठ्या सभांपुरते मर्यादित राहिलेले नाही; सोशल मीडिया, डेटा व्यवस्थापन, मतदारांचे सूक्ष्म विश्लेषण आणि सातत्याने जनसंपर्क यांना प्रचंड महत्त्व आले आहे. या नव्या राजकीय युगात तरुण नेतृत्व अधिक प्रभावीपणे काम करू शकते, हे वास्तव आता स्पष्ट होत आहे.

तरुण मतदारांना केवळ भावनिक भाषणे किंवा पारंपरिक राजकारण नको आहे; त्यांना सहभाग, संवाद, रोजगार, तंत्रज्ञान आणि परिणामकारक प्रशासन अपेक्षित आहे. त्यामुळेच आजचा मतदार वयस्क नेतृत्वापेक्षा ऊर्जावान, सतत सक्रिय आणि डिजिटल माध्यमांशी जोडलेले नेतृत्व अधिक स्वीकारताना दिसतो.

भारतीय लोकशाहीसमोर आजचा मोठा प्रश्न केवळ सत्तांतराचा नाही, तर पिढीपरिवर्तनाचा आहे. देशाची लोकसंख्या तरुण असताना राजकारणही त्या तरुणाईच्या आकांक्षा, ऊर्जा आणि विचारांशी सुसंगत होणे ही काळाची गरज बनली आहे. भाजपने या बदलाची दिशा तुलनेने लवकर ओळखली, तर काँग्रेस अजूनही त्या संक्रमणाच्या टप्प्यात संघर्ष करताना दिसते. मात्र भविष्यात कोणताही पक्ष टिकून राहणार असेल, तर त्याला तरुण नेतृत्व, मजबूत संघटनात्मक रचना आणि नव्या पिढीच्या मानसिकतेशी सुसंगत राजकीय दृष्टिकोन स्वीकारावा लागणार आहे.

कारण भविष्यातील भारत घडविण्याची ताकद जर तरुणाईमध्ये असेल, तर त्या भारताचे नेतृत्वही नव्या पिढीकडे जाणे अपरिहार्य ठरणार आहे. अर्थात आयुष्य घालवलेल्या पक्षाची कमांड आपल्या हातात न ठेवता तरुणांच्या हातात देणे यासाठी पक्षनिष्ठा, त्याग आणि देशसेवा ही मूल्ये आपल्या स्वार्थाचा बळी देऊनच स्वीकारावी लागतात. मन आणि विचाराच्या कशा रुंदावल्या तर हे सहज शक्य होते. स्वातंत्र्य संग्रामात निस्वार्थी लढणाऱ्या सैनिकांनी/नेत्यांनी ज्या प्रकारच्या देशाचे स्वप्न पाहिले होते ते पूर्ण ही होऊ शकते. अन्यथा स्वातंत्र्य संग्रामात शुन्य योगदान असलेल्या लोकांच्या हाती देश सोपवून,स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्यावर पाणी फेरणेच होईल हे मात्र निश्चित!

**डॉ प्रशांत विघे**
**सिनेट सदस्य,**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**
**9326877749**



# उकाड्यात जनता हैराण, महावितरणचा बेजबाबदार कारभार चर्चेत
# ११ मे रोजी रात्री हनुमान नगर व डोंगरगाव फिडरचा वीजपुरवठा खंडित

## “वारंवार फोन करून विचारू नये” मेसेजमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी :** लासलगाव परिसरासह हनुमान नगर, डोंगरगाव आणि आसपासच्या भागात सध्या उष्णतेची तीव्र लाट कायम असून तापमानाने तब्बल ४२ अंशांचा टप्पा गाठला आहे. दिवसभर अंगाची लाही लाही करणाऱ्या उन्हामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. अशा परिस्थितीत ११ मे रोजी रात्री अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना उकाड्यात रात्र जागून काढावी लागली. विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक, रुग्ण आणि महिलांचे मोठे हाल झाले. मात्र या गंभीर परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्याऐवजी महावितरणकडून सोशल मीडियावर टाकण्यात आलेल्या एका मेसेजमुळे संतापाची लाट उसळली आहे.

महावितरणच्या सोशल मीडिया अपडेटमध्ये, “लासलगाव 132 केव्ही उपकेंद्र यांच्या आदेशानुसार 11 केव्ही हनुमान नगर व 11 केव्ही डोंगरगाव फिडर लोड शेडिंग केले आहे. लाईट 11:30 वाजेपर्यंत येईल तरी ग्राहकांनी वारंवार फोन करून विचारू नये,” असा मजकूर प्रसिद्ध करण्यात आला होता.



हा मेसेज काही मिनिटांतच सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि नागरिकांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर ग्राहकांनी माहिती विचारायची नाही तर काय करायचे? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. “महावितरणला ग्राहकांकडून वेळेवर बिल हवे असते, मात्र सेवा देताना आणि माहिती देताना मात्र जबाबदारी झटकली जाते,” अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. काही नागरिकांनी तर “जनता उकाड्याने तडफडत असताना महावितरणला मात्र फोनचा त्रास जास्त वाटतो,” अशा शब्दांत संताप व्यक्त केला.

**“महावितरणचा कारभार दिवसेंदिवस बेशिस्त आणि बेफिकीर होत चालला आहे. जनता उकाड्याने हैराण झाली, रात्री वीज नाही, लहान मुले रडत होती, वृद्ध त्रस्त होते; पण अधिकाऱ्यांना जनतेच्या वेदनांपेक्षा फोनचा त्रास जास्त वाटतो, हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे. ‘वारंवार फोन करून विचारू नये’ हा मेसेज म्हणजे ग्राहकांचा सरळसरळ अपमान आहे. आम्ही बिल भरताना एक दिवस उशीर केला तर दंड आकारला जातो, मग सेवा देताना महावितरणची जबाबदारी कुठे जाते? जनतेला माहिती विचारण्याचाही अधिकार नाही का? नागरिकांनी अडचण सांगायची नाही, प्रश्न विचारायचे नाहीत, मग महावितरण नेमकं जनतेसाठी काम करतंय की जनतेवर उपकार करतंय?”**

**— ग्राहक संदीप निमसे**

परिसरातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही दिवसांपासून वारंवार होणारे लोडशेडिंग, कमी दाबाने होणारा वीजपुरवठा आणि देखभालीच्या नावाखाली होणारे तासन्तास खंडित होणारे वीजपुरवठे यामुळे नागरिक आधीच त्रस्त आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत पंखे, कुलर आणि इतर विद्युत उपकरणे बंद पडल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे. ग्रामीण भागात तर रात्रीच्या अंधारात नागरिकांना डास, उकाडा आणि पाणीटंचाईच्या समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे.

अशा परिस्थितीत महावितरणकडून वापरण्यात आलेली “वारंवार फोन करून विचारू नये” ही भाषा नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळणारी असल्याची टीका होत आहे. ग्राहकांच्या तक्रारी ऐकून घेण्याऐवजी त्यांनाच गप्प बसवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. सोशल मीडियावर या मेसेजवरून महावितरणवर जोरदार टीका होत असून संबंधित अधिकाऱ्यांनी नागरिकांची माफी मागावी आणि भविष्यात अशी असंवेदनशील भाषा वापरू नये, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दरम्यान, वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणने तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच लोडशेडिंगबाबत नागरिकांना योग्य आणि सन्मानपूर्वक माहिती द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जयंती: भराडीत 'बुधभूषणम'चा जागर घुमणार



**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एका स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन केले आहे. शिवपुत्र संभाजी महाराजांच्या अद्वितीय साहित्यिक पैलूला अभिवादन करण्यासाठी येत्या १४ मे रोजी (उद्या) त्यांच्या स्वलिखित 'बुधभूषणम' या ग्रंथाचे सामूहिक वाचन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या नियोजनासाठी विद्यार्थ्यांची विशेष उत्सव समिती गठीत करण्यात आली असून, अध्यक्षपदी इयत्ता दहावीचा विद्यार्थी युवराज राऊत, तर उपाध्यक्षपदी यश अक्कर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या जयंती सोहळ्याच्या माध्यमातून महाराजांच्या शौर्यासोबतच त्यांच्या विद्वत्तेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला आहे.या नियोजन बैठकीप्रसंगी समितीचे सदस्य तुषार आग्रे, ऋषिकेश शिंदे, परमेश्वर निकम, अजिनाथ पंडित, कार्तिक काकडे, देवेंद्र शेळके, अनिकेत नेव्हारे, समर्थ काकडे, अल्कमा शेख, आदित्य गायकवाड, कृष्णा आग्रे, हर्षल साळवे, रेणुका जंजाळ, रोहिणी खांदवे, भक्ती बिडवे, भक्ती जाधव, भक्ती काकडे यांची उपस्थिती होती. या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून कुशल देशमुख, रायभान जाधव, श्रीराम जंजाळ, सीताराम शिंदे, डी. जी. देशमुख, कृष्णा सपकाळ, दादाराव श्रीनाते, श्री. गोराडे, योगेश भोटकर यांचे सहकार्य लाभत आहे.

**विद्वत्तेचा वारसा: राजे विद्यार्थ्यांचे आदर्श**

छत्रपती संभाजी महाराज हे केवळ रणधुरंधर योद्धाच नव्हते, तर ते १४ पेक्षा अधिक भाषांचे पंडित आणि श्रेष्ठ साहित्यिक होते. त्यांनी वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी संस्कृत भाषेत 'बुधभूषणम' या ग्रंथाची रचना केली होती. राजांमधील हा साहित्यिक गुण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, याच कार्याला उजाळा देण्यासाठी सामूहिक वाचनाचा उपक्रम हाती घेतल्याची माहिती उत्सव समितीचे अध्यक्ष युवराज राऊत यांनी दिली.

# भराडी परिसरात तापमानाचा पारा ४१ अंशांच्या पार; जनजीवन विस्कळीत

## पद्मभूषण डॉ. तात्याराव लहाने यांचा तालुकावासीयांना आरोग्याचा 'मंत्र'; खबरदारी घेण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस रौद्र रूप धारण करत असून, भराडी येथे तापमानाचा पारा ४१ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याची नोंद झाली आहे. रणरणत्या उन्हामुळे दुपारच्या सत्रात रस्त्यांवर शुकशुकाट पसरला असून, अत्यावश्यक कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या नागरिकांना टोपी, रुमाल किंवा सुती कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर तालुकावासीयांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



उन्हामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे (डीहायड्रेशन), उष्माघात, चक्कर येणे, डोकेदुखी, अशक्तपणा आणि डोळयांची जळजळ होणे अशा तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. या संदर्भात मुंबई येथे सध्या नेत्ररुग्णालय चालवित असलेले, जे. जे. रुग्णालयाचे सेवानिवृत्त अधिष्ठाता तथा पद्मभूषण डॉ. तात्याराव लहाने यांनी नागरिकांना प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले आहे. "योग्य आहार आणि शारीरिक संरक्षण यामुळे उन्हाळयातील संभाव्य आजार टाळणे शक्य आहे," असे त्यांनी नमूद केले.

**"उन्हाळ्यात केवळ तहान लागल्यावरच नाही, तर ठराविक अंतराने पाणी पिणे गरजेचे आहे. योग्य आहार आणि साधे शारीरिक संरक्षण यामुळे उष्माघात व इतर उष्णतेचे त्रास प्रभावीपणे टाळता येऊ शकतात."**

**— डॉ. तात्याराव लहाने (ज्येष्ठ नेत्रचिकित्सक तथा सेवानिवृत्त अधिष्ठाता, जे. जे. रुग्णालय)**

**आरोग्यासाठी या सूचनांचे करा पालन :**

**पेय जल:** दिवसातून पुरेसे व स्वच्छ पाणी प्यावे. ताक, लिंबूपाणी, नारळपाणी यांसारख्या नैसर्गिक पेयांचा वापर वाढवावा.

**आहार:** आहारात पालेभाज्या, फळे, कलिंगड, खरबूज व काकडी यांचा समावेश करावा. मसालेदार, तेलकट व अतिगरम पदार्थ टाळावेत.

**वेळेचे भान:** दुपारी १२ ते ४ या प्रखर उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाणे शक्यतो टाळावे.

**पेहराव:** बाहेर पडताना सुती व सैल कपडे वापरावेत. डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करावा.

**पायांचे रक्षण:** उन्हात चालताना चामड्याचे किंवा कापडी बूट-चप्पल वापरणे अधिक हिताचे ठरेल.

**नेत्र सुरक्षा:** तीव्र उन्हापासून डोळ्यांच्या संरक्षणासाठी दर्जेदार सनग्लासेस (चष्मा) वापरावा.

# विशेष सखोल पुनर्निरक्षण कार्यक्रमाचे जिल्हाधिका-यांकडून पूर्वतयारीचा आढावा !!



**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : निवडणूक आयोगातर्फे मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनर्निरक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्याच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्याच्या दृष्टीने समन्वय अधिका-यांची बैठक जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत झाली.

निवडणूक उपजिल्हाधिकारी महेश परंडेकर, उपजिल्हाधिकारी विजय पाटील, न. प. प्रशासन अधिकारी विश्वनाथ वडजे, जिल्हा माहितीविज्ञान अधिकारी अनिल चिंचोले, श्रीनिधी वाजपेयी आदी उपस्थित होते.

अचूक, अद्ययावत व पारदर्शक मतदार यादी तयार करणे ही लोकशाही प्रक्रियेची अत्यंत महत्वाची बाब आहे. त्यामुळे विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रशिक्षण, नियोजन आदी बाबींच्या अनुषंगाने मनुष्यबळ व इतर यंत्रणा सुसज्ज असावी.

समन्वय अधिका-यांनी संनियंत्रण व समन्वयनाची जबाबदारी पार पाडण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

मयत, दुबार, कायम स्थलांतरितांची नावे वगळणे, मॅपिंग, उपलब्ध मनुष्यबळ, प्रशिक्षक, प्रशिक्षण, ‘बुक अ कॉल’ उपक्रम, पुनरीक्षण फॉर्म, अपेक्षित कामे आदी विविध बाबींविषयी यावेळी चर्चा झाली.

# पनवेलच्या १३ वर्षीय आरोही हेमराज बेलोसे हिने 'टॉप ५' मध्ये पटकावले स्थान



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** ॲनिक्स इव्हेंट्स यांच्या वतीने वाशी येथील सिडको सभागृहात 'मिस युनिव्हर्स महाराष्ट्र' आणि 'मिस टीन महाराष्ट्र' या भव्य राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या दिमाखदार सोहळ्यात पनवेलच्या १३ वर्षीय आरोही हेमराज बेलोसे हिने आपल्या सौंदर्याने आणि आत्मविश्वासाने सर्वांना मंत्रमुग्ध करत 'टॉप ५' मध्ये स्थान पटकावले आहे. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक स्पर्धक सहभागी झाले होते. या सर्वांमध्ये आरोही ही सर्वात तरुण स्पर्धक होती, हे विशेष. अवघ्या १३ व्या वर्षी मोठ्या आत्मविश्वासाने रॅम्पवर वावरत तिने अंतिम पाच स्पर्धकांमध्ये झेप घेतली. तिने दिलेली तगडी झुंज आणि तिचे व्यक्तिमत्व पाहून परीक्षक आणि उपस्थित प्रेक्षकांनी तिचे विशेष कौतुक केले. आरोहीच्या या यशामुळे पनवेल शहराच्या वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. अत्यंत कमी वयात राज्यस्तरीय व्यासपीठावर आपली मोहोर उमटवणाऱ्या आरोही वर सध्या सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# अभिनय प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन उत्साहात संपन्न
## पनवेल,खारघर,कळंबोली मधून कलावंताचा भरभरून प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नऊ दिवसांच्या अभिनय प्रशिक्षण शिबिराचे दिनांक 11 रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या तिसऱ्या मजल्यावर उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या उद्घाटन प्रसंगी विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, सन्माननीय महापालिका सदस्य प्रीती जॉर्ज, डॉ.अस्मिता घरत, सुमित झुंझारराव, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे उपस्थित होते.




यावेळी कलावंतांना मार्गदर्शन करताना विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे म्हणाले, "खरी कला ही नाटकामधून दिसते. माणसाच्या भावना नाटकामधून अधिक ठळकपणे मांडता येतात. नाटकाच्या माध्यमातून मांडलेला विषय माणसाच्या मनात , -हदयात कायमस्वरूपी कोरला जातो. त्यामुळे नाटक ही जिवंतकला असल्याचे त्यांनी सांगितले."

तसेच अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी सांगितले, "या नाट्य शिबिराला मिळालेला प्रतिसाद खरोखर वाखणण्यासारखा आहे. यातूनच आम्हाला आणखीन काम करण्याची प्रेरणा मिळते. यापुढेही महापालिकेच्यावतीने अशा प्रकारचे उत्तमोत्तम उपक्रम कलावंतासाठी राबविले जातील आश्वासन यावेळी त्यांनी दिले."

यावेळी उपस्थित सन्माननीय महापालिका सदस्य प्रीती जॉर्ज, डॉ.अस्मिता घरत, सुमित झुंझारराव यांनीही यावेळी शिबीरार्थींना मार्गदर्शन केले. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात उत्तम कलावंत निर्माण व्हावेत यासाठी महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजू पाटोदकर यांनी केले व आभार अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कार्यवाह शामनाथ पुंडे यांनी केले. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे पदाधिकारी स्मिता गांधी, कविता ठाकूर, गणेश जगताप व मोठ्या संख्येने शिबिरार्थी उपस्थित होते.

**मान्यवरांचे मार्गदर्शन**

नाट्य, सिने क्षेत्रातील मान्यवरांकडून शिबीरात मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच शेवटी सर्व प्रशिक्षणार्थींचे सादरीकरण होईल. सर्व शिबीरांर्थींना समारोपादिवशी सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

अभिनय प्रशिक्षण शिबीरासाठी प्रत्येक केंद्रावर दोन गट निश्चित करण्यात आले आहेत.

यात पहिला गट वय वर्षे 5 ते 16 तर दुसरा गट हा युवा व प्रौढांसाठी असून 17 ते 65 वयांपर्यंत आहे. पनवेल, कळंबोली, खारघर येथे पहिली बॅच सकाळी 8:30 ते 11:30 व दुसरी बॅच संध्याकाळी 4:3० ते 7:30 अशी असणार आहे.

# आपले अस्तित्व कायम राखण्यासाठी लाईनआळीतील तिन्ही मंडळांनी हातात हात घालून कार्य केले पाहिजे – शिवसेना ज्येष्ठ सल्लागार रमेश गुडेकर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** यापुढे येणारी परिस्थिती अत्यंत कठीण होत जाणार असून पनवेलमध्ये स्थानिकांबरोबर मोठ्या प्रमाणात बाहेरील व्यक्ती व व्यापारी येथे येणार आहेत. त्यामुळे आपले अस्तित्व कायम राखण्यासाठी लाईनआळीतील तिन्ही मंडळांनी हातात हात घालून कार्य केले पाहिजे असे प्रतिपादन शिवसेना ज्येष्ठ सल्लागार रमेश गुडेकर यांनी लाईनआळीयेथील शिवाजी क्रीडा युवक मंडळाच्या महापूजा निमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना केले.



यावेळी पनवेल महापालिकेच्या नगरसेविका दर्शन भोईर, दीपक शेट्ये, सुधीर सावंत, जतीन भेंडे, शिवराज साखरे, राजेंद्र साखरे, विकास म्हात्रे आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना रमेश गुडेकर यांनी सांगितले कि लाईनआळी येथील शिवशक्ती मित्र मंडळ, शिवाजी क्रीडा युवक मंडळ व एकता मित्र मंडळ हि मंडळे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. हा विभाग माझा आहे. ह्या विभागाने मला बाप बनवले आहे. त्याला मी कधीही विसरणार नाही ह्या विभागातील कदम परिवार, चव्हाण परिवार, नरसाळे परिवार ह्या सर्व परिवारांनी मला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले. प्रत्येक संघर्षामध्ये त्यांनी माझे संरक्षण केल्याने मी त्यांचे जास्तीत जास्त देणे लागत आहे. व मी हे माझे कर्तव्य समजतो. त्यामुळे आपापसातील मतभेद विसरून सर्वांनी एकत्र यावे असे आवाहन गुडेकर यांनी केले.

**फूड वे इन' रेस्टॉरंटसह व्यावसायिक आस्थापनांची बेजबाबदारी...**

# खारघर सेक्टर ४ मधील बेकायदेशीर अतिक्रमणांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक युवक आधार**

**खारघर वार्ताहर :** खारघर सेक्टर ४ येथील भूमि टॉवर परिसरातील 'फूड वे इन' रेस्टॉरंटसह काही व्यावसायिक आस्थापनांनी आर्थिक फायद्यासाठी नागरिकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. हॉटेल व्यवस्थापनाने सुरक्षेचे नियम पायदळी तुडवत हॉटेलबाहेरील रहदारीच्या जागेवर आसन व्यवस्था उभी केल्याने विद्यार्थी, ग्राहक तसेच स्थानिक नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.




विशेषतः विद्यार्थ्यांची या परिसरात मोठ्या प्रमाणात वर्दळ असताना रस्त्यालगत करण्यात आलेल्या अतिक्रमणांमुळे अपघाताचा धोका वाढला असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. काही व्यवसायिकांकडून रस्त्यालगत बेकायदेशीर पद्धतीने उद्योगधंदे चालवले जात असून त्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

या संपूर्ण प्रकाराकडे संबंधित वार्ड अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत असून प्रशासनाच्या बेजबाबदार भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती कारवाई करून बेकायदेशीर अतिक्रमणे हटवावीत तसेच "सुंदर शहर, सुरक्षित शहर" या संकल्पनेनुसार परिसर मोकळा व सुरक्षित करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

पालिका प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित व्यावसायिकांवर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# अभंग निरूपण

**निरूपण : ह.भ.प. तुळशीराम लबडे महाराज, अहिल्यानगर**

**अभंग :**

अमृत टाकून कांजीची आवडी । साजेना झोपडी काय त्याला ॥१॥

खरासी अखंड गंगेचे हो स्नान । गेले वायाविण जिणे त्याचे ॥२॥

पोवळ्याहुनी अधिक दिसती रामगुंजा । शृंगाराच्या काजा न येती त्या ॥३॥

आनारा परिस चोकट इंद्रावन । चवी कडूपण हीन त्याचे ॥४॥

रंगाची बाहुली दिसती साजिरी । बेगडाचे परी नग त्याली ॥५॥

म्हणे मुकाबाई, पुरे ते दर्शन । गुरुविण संतपण आहे कोठे ॥६॥




**शब्दार्थ :**

- कांजी — पेज, तांदूळ शिजवून केलेला पदार्थ
- साजेना — शोभणे, चांगले दिसणे
- खर — गाढव
- शृंगार — नटणे
- आनारा — डाळिंब
- इंद्रावन — जंगली कडू फळे देणारे झाड
- साजिरी — छान, गोड
- बेगड — खोटा साज, खोटे दागदागिने

**आशय :**

- गुरु शिवाय ज्ञान नाही. ज्ञानाशिवाय संतदर्शन नाही. म्हणून गुरु आणि संत यांच्या शरण जावे.
- जो अमृत सोडून कांजी किंवा पेज पितो, त्याला भव्य महाल नसे तर झोपडीच शोभते.
- गाढवाला रोज गंगास्नान घातले तरी तो उकिरड्यावर लोळण्यात आयुष्य वाया घालवतो. त्याप्रमाणे अज्ञानी माणसाला कितीही उपदेश केला तरी अज्ञानामुळे त्याचे जीवन व्यर्थ जाते.
- रानातील गुंजा पोवळ्याच्या खड्यांपेक्षा सुंदर दिसतात, परंतु त्या अलंकारासाठी उपयोगी पडत नाहीत. डाळिंबापेक्षा इंद्रावनातील कडू फळे आकर्षक दिसतात, पण त्यांची चव कडू असते.
- मातीची बाहुली बेगडी दागिन्यांनी सजवली तरी तिचा काही उपयोग होत नाही. त्याप्रमाणे केवळ बाह्य दिखावा करून खरे संतपण प्राप्त होत नाही.
- संत मुकाबाई म्हणतात, सद्गुरूच्या कृपेशिवाय खरे संतदर्शन होत नाही.

**शिकवण :**

"सदगुरूंचे दर्शन घ्या, संतांच्या शरण जा. सद्गुरू शिवाय अज्ञान जात नाही आणि अज्ञान गेल्याशिवाय खरे संतदर्शन प्राप्त होत नाही."

— ह.भ.प. तुळशीराम लबडे महाराज, अहिल्यानगर

# सावित्रीच्या लेकिंचे प्रेरणादायी यश !

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ८९.. ७९ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९४ . १४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८४.१४ टक्के इतका लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे. लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे, दुसरी पसंती लातूर तर तिसरी पसंती बारामती ही आहे. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ८९.७९ टक्के लागला. जो मागील वर्षीच्या तुलनेत २.०९ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षी म्हणजे २०२५ साली बारावीचा निकाल ९१.८८ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टाक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी गेल्या वर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९३.१५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ४ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८६.८० टक्के इतके आहे. केवळ बारावीतच नाही तर दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. दहावीच्या परीक्षेत ९४.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे याचाच अर्थ बारावी प्रमाणे दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत.



श्याम ठाणेदार